ग्र. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

# श्रीसाई गीतायन



REFBK-0018588

- चकोर आजगांवकर

केशव भिकाजी ढवळे

काव्य.
२१०९

# श्री साईगीतायन

कवी
चकोर आजगांवकर

ग्रंथ संग्रहालय ठाणे

प्रस्तावना : श्री. शांताराम आठवले

परिचय : पू. दत्ता बाळ, प्रा. के. वि. बेलसरे

पुरस्कार : श्री. पु. रा. बेहेरे, श्री. श्रीनिवास खळे

REFBK-0018588

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगाव मुंबई

किंमत पाच रुपये

卐

© चकोर आजगांवकर

卐

आवृत्ती पहिली
१९७२

卐

किंमत पाच रुपये

卐

मुखपृष्ठ छपाई
ज्योति आर्ट प्रिंटर्स,
मुंबई ११

卐

मुद्रक
वि० पुं० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
गिरगांव, मुंबई ४

卐

प्रकाशक
धनंजय बाळकृष्ण ढवळे
केशव भिकाजी ढवळे
गिरगांव, मुंबई ४

卐

अनुक्रम ... ७१०८७ दि: ...०१/०५
क्रमांक ... २१०८ ...

## समर्पण

मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ।

मज जो गाई वाडेकोडे । माझे चरित्र माझे पवाडे ।
तयाच्या मी मागेपुढे । चोहीकडे उभाची ॥

अनन्याश्चिंतयन्तो मां ये जना पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

तुम्हाआम्हामधली भिंत । पाडुन टाका पहा समस्त ।
मग जाण्यायेण्याचा मार्ग प्रशस्त । अतिनिर्धास्त होईल ॥

ऋणानुबंधाच्या गाठी । भाग्ये तुम्हा आम्हा भेटी ।
धरू परस्परप्रेम पोटी । सुखसंतुष्टी अनुभवू ॥

जन्म कर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्त्वतः ।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति पाण्डव ॥

असे प्रतिज्ञापूर्वक आश्वासन देणाऱ्या सच्चिदानंद सद्गुरू

**श्रीपादश्रीवल्लभ श्रीसाईबाबांच्या**

पावन चरणी

श्रद्धा व शरणागतिपूर्वक सप्रेम

**समर्पण**

## ॐकाररूप तू....

| | |
|---|---|
| जयजय श्रीप्रणवाकारा | मूलाधार–चक्राधारा |
| शब्दब्रह्मात्मका छंदाकारा | नमन तुजसी गणराया.... |
| शारदावीणा–झंकार | तो तुझा प्रतिभाविष्कार |
| नवनवोन्मेषांचा साक्षात्कार | क्षणोक्षणी घडवीसी.... |
| तू वाङ्मय, तू चिन्मय | आनंदमय, तू ब्रह्ममय |
| केवळ सच्चिदानंदाद्वितीय | मूर्तिमंत सर्वेश्वर ! |
| तू ज्ञानमय, विज्ञानमय | विश्वाधार अद्वितीय |
| जगत्कारण अप्रमेय | प्रत्यक्ष जगदीश्वर ! |
| सर्व मंगलांचे कारण | सकळ विघ्नांचे निवारण |
| सर्वार्थसिद्धींचे साधन | ॐकाररूप तू.... |

काव्याला साईचरित्रगायनासारख्या दिव्यतेचा ध्यास लागतो, तेव्हा कवीची आर्तता कृतार्थ होते. अमृताला छंदांचे पंख फुटतात, कारुण्याला सौख्याची किनार जडते, भक्तीत आर्तता भरते, मन द्वंद्वातीत समतेच्या तीरावर उतरते, अहंकारात परमेश्वरी अस्मिता दरवळते ! प्राणांचा विश्वरूपात लय होतो. प्रकाशातून लालित्याची अक्षर लिपी लिहिली जाते. आनंदवाणी अशा अर्थामागून धावत येते.

श्रीसाईबाबांवरील प्रेमाला शब्दांचा घाट बांधताना मीही असाच कृतार्थ झालो आहे. त्या प्रेममय, आनंदघन साईप्रभूचे चरित्र जेवढे अद्भुत तेवढेच दिव्य आहे ! दिव्यतेने उजळलेले, चमत्कारांनी रंगलेले, अमृतमय अनुभवांनी ओसंडणारे आहे. ते शब्दांना, तर्काला अगम्य आहे. प्रज्ञाप्रतिभेला अज्ञेय आहे. परंतु आर्तभावाला व प्रेमभक्तीला ते सहजसुलभ आहे.

याच प्रेमातून ही साईगीता स्फुरली आहे. याच प्रेमचक्षूंनी तो साईचंद्र या भक्तचकोराने पाहिला. त्या अमृतमय चंद्रिकेतूनच साई–गीतायनाची तेजोमय वैखरी निर्माण झाली. संसाराच्या कर्दबाखालून वाहणाऱ्या कालिंदीचा हा अमृतमय प्रेमप्रवाह त्या श्यामसुंदर मुरलीधराच्या कृपेसह येथे शब्दाकार झाला आहे.

**—चकोर आजगांवकर**

# परिच्चय

## पूज्य श्री दत्ता बाळ :

श्री. चकोर आजगांवकर हे एक अभीप्सावान कवी आहेत. त्यांच्या काव्याची दिशा ऊर्ध्वगामी आहे. अनंताची वेदना व चिरंतनाचे वेड ही श्रीसाई गीतायनाची अंतःप्रेरणा आहे. ते अनादि वेड श्री. चकोर आजगांवकरांच्या प्रतिभेने गाऊन आळवून दाखविले आहे.

शिरडीचे साईबाबा हे त्या अनंताचेच मूर्तस्वरूप होय. श्रीबाबांच्या दिशेने जेव्हा श्री. आजगांवकरांचे भावनागरूड झेपावतात, तेव्हा त्यांच्या प्रतिभेला ऊर्ध्वगामित्वाची जाण येते.

## प्रा. केशवराव बेलसरे :

भक्ती व प्रतिभा यांच्या अतूट व समवाय संबंधास तादात्म्य म्हणतात. शब्द व अर्थ यांचा अद्वैत अभेद कवी व काव्य या द्वैतातही सापडतो. उपास्यदेवतेवरील भक्तीला भर आला की भाव जागृत होतो. मनोहारी प्रतिमा अंतरात उदित होतात शब्दांत संजीवनी ओतून कवी त्या प्रतिमा जिवंत, श्रवणमधुर, रसरशीत व शाश्वत बनवितो.

हा आर्तभावाचा चटका लावण्याचा गुण श्री. चकोर आजगांवकरांच्या काव्यसाधनेत आहे, यात शंका नाही. कवीचे व्यक्तित्व विकसनशील व्हावे, तो नवोन्मेषांनी ताजातवाना राहावा व त्याला उत्तम यश मिळावे, ही सदिच्छा प्रगट करताना त्यांची उपासना अधिकाधिक सतेज बनून काव्यप्रतिभा विकसित व सिद्धहस्त व्हावी, ही अपेक्षा !

# संतांचे आशीर्वाद

**श्री. वामनरावजी गुळवणी महाराज :**

'वाचे बरवे कवित्व । कवित्वी रसिकत्व ।
रसिकत्वी परतत्त्व । स्पर्शू जैसा ॥

या ज्ञानदेवांच्या उक्तीप्रमाणे वैखरीतून परातत्त्वपर्यंत रसिकांचे मन उंचावण्याचा श्री. आजगांवकरांचा हा काव्य व संगीतमय हव्यास दत्तकृपेने सफळ होवो.

**डॉ. विठ्ठलराव घटवाई :**

श्रीसाईबाबांच्या व्यक्तित्वाचे आगळे दर्शन, प्रासादिक शैली, गाढ श्रद्धा व सहजसुलभ विवेचन यांमुळे हे काव्य 'गीतरामायणा'-इतके लोकप्रिय व्हावे, हे आमचे आशीर्वाद श्री. आजगांवकरांच्या सतत पाठीशी आहेत.

**स्वामी मुक्तानंद परमहंस :**

श्री. आजगांवकरांची गीते म्हणजे जगन्माता कुंडलिनीचा शब्द-प्रसादच! सारे वेद व योग श्रीबाबांच्या सेवेशी हजर असत. अशा प्रचंड अवतारी पुरुषाचे, (इच्छामात्रे जीवन्मुक्ती देणाऱ्या महात्म्याचे) दिव्य चरित्र कुंडलिनीच्या उन्मेषाने लिहिले जाण्याचा हा महायोग आहे.

**भाऊमहाराज चिंदरकर :**

भगवान श्रीपादश्रीवल्लभ श्रीसाईरूपात देवभक्तांचा द्वैतपणा न मोडता 'श्रीसाईगीतायना'द्वारे भक्तिप्रेमाची माधुरी स्वयमेव अद्वैतपणे चाखीत आहेत. 'श्रीसाईवचनामृत' व 'संतकल्पतरू' ग्रंथांच्या लेखनाची प्रेरणा श्रीपादसाई कवीला देवोत.

याशिवाय भगवान सत्यसाईबाबा, 'दिव्यामृतधारा'कार बाबामहाराज आर्वीकर जोशी, स्वामी स्वरूपानंद, गगनगडकर स्वामी, पू. दत्ता बाळ, अष्टेकर महाराज, श्रीसिद्धराज माणिकप्रभू, पट्टेकर महाराज श्रीकाणेमहाराज, गोदावरीमाताजी, कलावतीदेवी, प्रा. बेलसरे, दास सच्चिदानंद (नागपूर), श्री. गरुडे (घाटकोपर) इत्यादि पुण्यचरित सत्पुरुषांच्या आशीर्वादांबद्दल श्रीसाईगीतायनकार त्यांचे ऋणी आहेत.

श्रीबाबा : ऐसे श्रोते बहुत असती । परी श्रवणे जोडी श्रद्धाभक्ती ।
ईश्वर वा संतचरणी प्रीती । हे श्रोतृस्थिती दुर्मिळ ॥

# पुरस्कार

श्रीसाईबाबांबद्दल मला विलक्षण आकर्षण वाटते, हा माझ्या वडिलांबरोबर घेतलेल्या दाणोलीच्या श्रीसाटममहाराजांच्या सहवासाचाच एक संस्कार आहे. संत व सत्पुरुषांच्या या आकर्षणातूनच व त्यांच्यासारखी नादमधुर रचना करणारा कवी आमच्या आजगावचा ह्या अभिमानातून त्यांच्या मैत्रीचा उदय झाला.

महाराष्ट्र सरकारच्या अर्थखात्यातील एक अधिकारी असूनही काव्य व साधुसंत या त्यांच्या प्रिय विषयांत कार्यालयीन विश्व मुळीच डोकावणार नाही! ते त्यांच्या आध्यात्म साधनेच्या अनुभवानें माझे कुतूहल सदैव टवटवीत राहाते.

'श्रीसाईगीतायना'च्या निर्मितीस माझी प्रेरणा त्यांना निमित्त ठरली ही अभिमान वाटण्यासारखी गोष्ट आहे. १९७० व ७१ मध्ये वर्ष दीड वर्ष हे गीतकाव्य 'नवशक्ती'तून प्रकाशात आले. वाचकांकडून पत्रांद्वारे व तोंडी होणारी विचारणा ही या गीताच्या गुणवत्तेची खरी पावती आहे. 'श्रीसाई-गीतायन' नादमधुर व भावमधुर आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. परंतु गीतारंभी आजगांवकरांनी केलेले गद्यनिवेदनही असेच आहे! जाणकारांना त्यांची आध्यात्मिक भूमिका समजेल असा मला विश्वास वाटतो.

**—'नवशक्ति'कार पु. रा. बेहेरे**

उण्यापुऱ्या दोन तपांतून मी श्री. चकोर आजगांवकरांच्या कविप्रतिभेचा विलास पाहिला. 'महाराष्ट्र जय' व 'आज पेटली उत्तरसीमा' या त्यांच्या गीतांना मी शाहीर साबळे यांच्या कंठातून स्वरांचा साजही चढविला. ही गीते महाराष्ट्रात घरोघरी पोहोचली आहेत.

श्रीसाईगीतायनातील गीतपुष्पांचा सुगंध आगळाच आहे. नादमधुर संगीतानुकूल शब्दांत त्यांनी श्रीबाबांसारख्या थोर महात्म्याचे चरित्र, चमत्कार व तत्त्वज्ञान मांडले आहे. त्यांच्या आध्यात्मसाधनेचा व प्रेमभक्तीचा परिमळ सर्वत्र दरवळला आहे.

भक्तांच्या अंतरात धुंद आनंद निर्मिणारी ही गीते मी निःसंकोच पुरस्कारितो. प्रतिभावंत स्वररचनाकारांच्या स्वरसंगीतावर आरूढ झाल्यास यातील गीते लोकप्रिय होतील यात शंका नाही. मी या गीतायनाला सुयश चिंतितो व त्याच्या संगीताद्वारे प्रसारास शक्य ते सहकार्य देण्याचे अभिवचन देतो.

**—संगीतकार श्रीनिवास खळे**

# जैसे शारदेचिये चंद्रकळे

गीत रामायणानंतर महाराष्ट्रात तशा तोंडवळ्याच्या गीतायनांचे एक पीकच आले. या सवंग अनुकरणाला ताल–सूर व गोड स्वर यांची महिरप व आकाशवाणीसारखे माध्यमही लाभले तरी रामायणाच्या गोडीचे व तोडीचे एकही गीतकाव्य झाले नाही! माझ्यासारख्या चोखंदळ अभिरुचीच्या माणसाचे समाधान काही जगावेगळे गवसल्यावाचून होत नाही. परंतु श्री. चकोर आजगांवकर या तरुण लेखकाच्या स्निग्ध व आर्जवी व्यक्तित्वाने व काव्याने मात्र माझ्या मनावर प्रथम भेटीतच अनुकूल ठसा उमटविला. त्यांच्या श्रीसाईगीतायनातील निवडक रचना त्यांनी मला अशा काही आत्मीयतेने वाचून दाखविल्या की, त्यांच्या लेखनातला आगळेपणा व रसवत्ता मला सुखवून गेली आणि मग मीच त्यांची गीते आनंदाने स्वतःच आस्वादिली. श्री. आजगांवकरांच्या भावभक्तीचा रसार्द्र उमाळा त्यांच्या शब्दाशब्दातून प्रतीत होतो. अंतरीची तळमळ, शब्दयोजनेची समर्पकता, रचनेचा घाटदारपणा, आशय, अभिव्यक्तीतील रसमय सहजता या त्यांच्या रचनेतील गुणांनी माझ्या मनाचा पुरता वेध घेतला.

श्री. आजगांवकर यांची वृत्ती हळुवार व भावकोमल आहे. तरुण वयात त्यांची प्रतिभा एखाद्या प्रेमिकेभोवती घोटाळत न राहाता तिने साईभक्तीचे विश्वव्यापक दिव्य प्रेमाचे स्वरूप धारण करावे ही नवलाची पण सत्य गोष्ट आहे! त्यांची अंतरीची भावगंगा जिवंत आशय व्यक्त करण्यासाठी शब्द धुंडीत बसत नाही. "नलगे काही वाचवावे। जातो भावे पेरित" किंवा "अर्थ बोलाची वाट पाहे। अभिप्रायची अभिप्राया वीये।" एवढे ते भक्तीत भिजून गेले आहेत. तेजाची आरती गाण्यासाठी त्यांनी सूर उंचाविला आहे. "संतरूप प्रभुप्रतिमा। गा त्यांचा नित महिमा। तेजाच्या आरतीस सूर उंचवावे॥ बाहु देत ओसंडुन। अमृतरस रसनेतुन। समरसुनी अष्टभाव तू रोमांचावे॥ संतत तू प्रेमभरे संतचरित गावे॥"

ही त्यांची भूमिका आहे.

श्री. आजगांवकरांच्या रसमय, दळदार काव्यपंक्तीतील शब्दपाकळ्या उमलत जाताना त्या श्रवणांना सुखकर होतात एवढेच नव्हे, तर त्यांच्या ठायी रूपरसगंधाचा आविष्कार झाल्याचा चमत्कार दिसतो. विश्वमोहिनी शारदेचा वरदहस्तच जणू त्यांनी मिळविला आहे, याची प्रचीती त्यांचे

रूपसंपन्न गणेशस्तवन देते. एका गणेशस्तवनावरूनच त्यांच्या लेखणीला परतत्त्वाचा झालेला साक्षात्कार जाणवतो. शब्दप्रभू श्रीज्ञानेश्वरानंतर आधुनिक कवीने केलेले अशा प्रकारचे रसाळ व देखणे गणेशवर्णन माझ्या तरी वाचनात आलेले नाही.

त्यांच्या साधकदशेच्या प्रौढत्वाचे, योग व भक्ती यांच्या प्रक्रियांच्या स्वानुभवाचे प्रमाणपुरावे त्यांच्या गीतात ठायी ठायी दिसतात. "सुजन हो, सहजसमाधी खरी" या ३१ व्या गीतातील ओळी पाहा : "परमानंदी उन्मन हो मन प्रकाशपंथा धरी। यमनियमाविण योग समजला सायुज्याच्या घरी ॥ तडिल्लता चमकते गुंजते ऋतंभरा वैखरी। अनाहताच्या रथात बसलो आलो हरद्वारी ॥ अलख पुरुष पलखात खेळतो चिद्गगनाभ्यंतरी। प्राणभृंग तो हंस भिरभिरे सहाहि चक्रावरी ॥"

त्यांच्या ३६ व्या गुरुदीक्षेवरील गीतात श्रीबाबा म्हणतात, "प्राणमनाचा मी अद्भुत लय। अनाहताचा ध्वनी नादमय। मी तेजोमय ज्योती चिन्मय। धरुन शक्तिकर हाती माझा कर शून्यात प्रवेश ॥" "सहस्रदळ कमळी मी गंध। परमशक्तिचा अमृतस्पंद। मुक्तछंद मी परमानंद। प्रणवनाद मी अखंड माझा सत्त्रावीत निवेश ॥"

चकोर आजगांवकरांच्या पल्लेदार प्रतिभेचा, नादमधुर सुश्लिष्ट रचनेचा व आध्यात्मिक गूढ प्रमेये सुबक सहज शब्दांकित करण्याच्या साहित्य-लीलेचा आणखी एक नमुना पाहा. "अनंततेतुन उसळत येतो प्रणवाचा हुंकार, घेतसे निराकार आकार ॥ ध्रु० ॥ अमूर्ततेला मिळे शरीर। ब्रह्मानंदा ये आकार। असारतेतहि भरते सार। अमरत्वास्तव झुरतो जेव्हा हा मृण्मय संसार ॥" "जे शरयूच्या तटी उमटले। कालिंदीच्या कुशीत रमले। वनवासी प्रासादी भ्रमले। दिव्य चरण ते पुनरपि करिती शिरडीतून पुकार ॥" (गीत २ रे). अशा सुबक रचनेची आणखी एक देखणी वानगी पाहा (गीत ३२ वे). "आर्त पिपासित नित्य उपेक्षित। यास्तव अंतर करुणरसांकित। कालदिशांचा भेदुनिया पट। मेघ दयेचा ओथंबुनि हा वर्षतसे जळभार ॥" अशा रसाळ पंक्तींची आवृत्ती पुन्हापुन्हा आढळते. ४० व्या गीतात श्री. आजगांवकरांनी शिरडीरूपी वैकुंठपुरीचे चित्रकाव्य सादर करण्यात अपार कौशल्य प्रगट केले आहे : "ही यात्रा दिव्याची। ही सीमा ज्ञाताची। पंथराज मोक्षाचा, हे शरण्यधाम ॥" या त्यांच्या वर्णनाचे सौंदर्य व औचित्य अवर्णनीय आहे, हे कोणाच्याही सहज ध्यानी येईल.

श्री. चकोर आजगांवकरांच्या गीतांनी मला नुसतीच मोहिनी घातली नाही तर एका अपार्थिव दिव्य विश्वाची प्रेमयात्रा घडविली. ही गीते

शब्दांबरोबरच नाद व संगीत घेऊन अवतरली आहेत. या संगीताशी संवाद साधता आला तर त्यांना तालसुराचा साज चढविलाच पाहिजे असे नाही, असे माझ्यासारख्या सोलीव अभिरुचीच्या रसिकाला निश्चयाने वाटेल. पण लौकिक गायनासाठी तसे करण्याची आवश्यकता वाटेल तेव्हा स्वररचनाकार या गीतांच्या अंतरंगवैभवाशी तन्मय होणारा असला पाहिजे एवढे निश्चित.

योगायोगाने गीताच्या रचनाकाराचे नाव चकोर आहे. त्याच्या या कृतीचे यथायोग्य मूल्यमापन ज्ञानदेवांच्या पुढील रसमय ओवीनेच करणे उचित ठरेल.

"जैसे शारदेचिये चंद्रकळे—
माजी अमृतकण कोवळे।
ते वेचिती मनें मवाळे।
चकोर नलगे॥"

—शांताराम आठवले, पुणे

[illegible] स्थळप्रत.
[illegible]........................ दि: ........................
[illegible]........................ [illegible] ........................

# एका साधकाची वाटचाल

'श्रीसाई गीतायन' लिहिण्याची प्रेरणा व शक्ती देणाऱ्या व लेखनात स्नेहप्रकाश ओतणाऱ्या श्रीपादश्रीवल्लभ साईंच्या चरणी लाख प्रणाम करून लेखणी हाती घेतो. श्रीसाई गीतायन हा माझ्या साधकावस्थेतील एक टप्पा, एक अवस्था आहे. अज्ञाताच्या यात्रेतील ही असीम कृपेची सीमारेषा आहे. ललितसाहित्य, कला, संगीत, प्रतिभा, भाव, विचार, तत्त्वचिंतन, सौंदर्य या मूल्यांनी मराठी टीकाकार व साहित्यिक त्याचे मूल्यमापन करोत वा न करोत, मला तरी ही एक मोक्षयात्राच वाटते !

हे गीतायन गेयरागिण्यावर आधारलेले काव्य असले तरी त्याला केवळ साईदर्शन व साईकृपा यांचीच मूळ बैठक आहे. लेखनकालातील श्रीबाबांच्या कृपाकरुणामय अंतःप्रेरणेच्या अनुभवामुळे माझा लेखन-कर्तृत्वाचा अहंकार 'शून्य' अंशावर आलेला आहे ! शब्दांत जेवढा आशय मी व्यक्त करू शकलो त्याहून अधिक शब्दातीत कृपास्वरूप या गीतांना अंतर्बाह्य व्यापून उरले आहे. श्रीसाईचरित्र राम व कृष्ण यांच्या चरित्रासारखे नवरसांनी भरलेले वा घटनाप्रधान नाही. बाबांचे जीवित व कार्य दोन्हीही गूढत्वाच्या पटलाने झाकलेली आहेत. बाबांच्या कृपेशिवाय त्यांचे समग्र जीवन, चरित्र, चमत्कार व तत्त्वज्ञान यांचा अन्वयार्थ लावावयास मानवी प्रज्ञा व प्रतिभा असमर्थ आहे. तरीही त्यांचे दिव्य नाट्यमय चमत्कार, विरोधाभासात्मक वर्तन, सूत्रमय मिताक्षरी वचने, दिव्य गुरु-संप्रदाय, ज्ञानभक्तियोग कर्म व गुरुकृपा याबाबतचे मार्गदर्शन, अलौकिक दृष्टिपातयोग, सहजसमाधीचा अमृतानुभव, नाथ व कबीरपंथी वारसा यांचे दिग्दर्शन मी केवळ त्यांच्या कृपाकरुणेच्या प्रकाशातच करू शकलो ! युगायुगातून सत्य, धर्म, प्रेम व शांती यांच्या प्रतिष्ठापनेसाठी अवतरणाऱ्या श्रीपादश्रीवल्लभ विष्णुदत्तांची ही साईरूपी प्रेमकरुणाशक्ती मी जाणली व ती हृदयात ठसविली. तिचे रूपरहस्य मुखपृष्ठावरील चित्रातही योगा-योगाने चित्रित झाले आहे. विश्वाला सामायिक धर्म व संस्कृती शिकविणाऱ्या या जातधर्मविहीन चैतन्याने भारताच्या जीवनाला अद्भुत चमत्कारांचा परिसस्पर्श केला व आपल्या प्रेमपंखांनी ज्ञानभक्तिकर्म व योगाचे सारसर्वस्व कृपेद्वारे सर्वांना सहजसुलभ केले !

नाथ व दत्तपंथातील योगाच्या व शक्तिपाताच्या अनुभवाकडे आकर्षिलेल्या माझ्या अंतरात श्रीबाबांनी प्रेमभक्तीचे दिव्य परिवर्तन घडविण्याचे महान कार्य केले. गुरुकृपेचे महात्म्य मला शिकविले. ही श्रीसाई

गीतायनाद्वारे मला मिळालेली देणगी आहे. भूतपूर्व सावंतवाडी संस्थानाची भूमी सोहिरोबानाथ, श्रीवासुदेवानंदसरस्वती, भारतीमहाराज, श्रीसाटम-महाराज इत्यादि संतांच्या स्पर्शाने पावन झाली आहे. आजगावची भूमी श्रीवेतालसिद्ध, भगवान दत्तात्रेय, शांतादुर्गा (सातेरी) यांच्या स्पर्शसंचाराने परिमळली आहे. श्रीअगम्यनाथांनीही ही भूमी दिव्यत्वाने स्पर्शिली आहे. अशी आजगावची उपासना दत्तभक्तीची आहे. वासुदेवानंदांना येथेच दत्तदर्शन, काव्यरचना, तीर्थसंचाराचा आदेश झाला. माझ्या वडिलांवर श्रीसाटममहाराजांची अपार कृपा होती. अक्कलकोटस्वामींची कृपा माझ्या आजोबा-आजींनी संपादन केली होती. स्वामीमठात निवांत चिंतनात तासन्‌तास घालविण्याचे भाग्य मलाही लाभले. पुढे विश्वविद्यालयातील अभ्यासातही संतचरित्र, तत्त्वज्ञान, गीता यांचा संग सुटला नाही. १९५५ साली महाराष्ट्र सरकारने माझ्या 'माणुसकीची जखम' या नाट्यास रु.१००० चे बक्षीस दिले, त्यावेळी श्रीबाबांच्या कृपेचा व शिरडीयात्रेचा पहिला अनुभव आला. पुण्यातील एक दत्तभक्त श्री. वसंत सुभेदार यांना मलंगवेषधारी दत्तावर मजकडून काव्यलेखन घडण्याची पहिली दृष्टांतसूचना १९६२ मध्ये झाली. त्याच वेळी मलाही अनेक दृष्टान्त झाले. 'शक्तिलाभ'बद्दल हनुमंताचा दृष्टान्त, व्याससदृश महर्षींनी शरीरात प्रवेश करून स्थूलसूक्ष्म देहात कंप निर्माण करणे, नाथहनुमंतांनी कान टोचून दीक्षा देणे, "भाषा मधुर है। शक्तिउपशक्तिओंका लाभ होगा।" असे श्रीसत्यसाईबाबांनी सुचविणे, अशा स्वप्नदृष्टांतांनी भूमिका तयार झाली. श्रीसत्यसाईबाबांवर 'भगवंत दक्षिणेत अवतरले' व 'सत्यसाई-दर्शन' या दोन गद्यपद्यात्मक पुस्तिका लिहिल्या गेल्या. गतजन्मीचा श्रीपादश्रीवल्लभांचा ऋणानुबंध श्रीसाईबाबांनी पुन्हा जुळवून घेतला. महाराष्ट्रातील तीर्थस्थळांच्या यात्रा, अनेक संतांच्या गाठीभेटी व मार्गदर्शन यदृच्छेने घडत गेले. श्रीदत्ताबाळांची प्रेमप्रक्षेपणात्मक, जे. कृष्णमूर्तींची ज्ञानात्मक व बाबामहाराज आर्वीकर जोशांची ज्ञानभक्तिसमन्वयात्मक विचारधारा हाती गवसली. अनुभवाचे विश्वही फुलत गेले. या सर्वांमागील घडण व प्रेरणा श्रीसाईबाबांच्या दिव्य अनुरागाचीच होती, हे निःसंशय !

सुभेदारांचा झालेला दत्तावरील काव्यलेखनाचा सूचनादृष्टान्त नवशक्ति-कारांच्या प्रत्यक्ष प्रेरणेतून १९७० मध्ये साकार झाला. नवशक्तिकार श्री. बेहेरे यांची थोर विचारवंत पत्रकार म्हणून ख्याती आहे. परंतु त्यांची श्रद्धामयता फारच थोडे जाणतात. बेहेरे घराणे संतप्रेम व ज्ञानभक्तीच्या किनाऱ्यावर जोपासले असल्याने त्यांच्या सामाजिक व राजकीय विचार-धारेला व्यापकता, उदारता व सत्वतेज लाभले आहे. श्री. बेहेऱ्यांच्या

प्रेरणेला खारचे श्री. व्यंकटेश पै यांच्या प्रेमळ आत्मीयतेची जोड होती. श्री. पै यांचे साईगीतायनावर मोठे ऋण आहे. दत्तवाङ्मय व दत्तभक्ती यांच्या प्रसारासाठी तळमळणारी ही तपोमूर्ती मसूरकरमहाराजांची कृपा, 'नामचिंतामणि'कार कामतांचे गुरुबंधुत्व यांचा सुगंध समवेत घेऊन साईगीतायनाच्या लेखनापासून प्रकाशनापर्यंत व श्री समर्थमंदिर प्रकाशनाद्वारे ग्रंथरूप देण्यापर्यंत, अत्यंत तळमळीने झटली. व्यक्तिशः त्यांनी मला दत्तभक्तीच्या व सगुण भक्तिप्रेमाच्या महात्म्याचे मर्म शिकविले व आपल्या दत्तकृपा व दत्तवाङ्मय व्यासंगाच्या पुण्याईचा प्रत्यक्ष आधारही दिला. श्रीसाईबाबांनीच त्यांच्या लौकिक देहाद्वारे हे कार्य साधले !

काव्यलेखनाच्या सुरुवातीच्या साशंक अवस्थेत माचणूरचे सत्पुरुष श्रीबाबामहाराज आर्वीकर यांनी मला आत्मविश्वास व चैतन्य यांचा प्रकाश दाखविला. 'अरे, मी तयार आहे.' या बाबांच्या शब्दांना त्यांनी सार्थ केले. 'दिव्यामृतधारे'सारखा दिव्य ग्रंथ निर्माण करणाऱ्या या मुक्त पुरुषाने वेळोवेळी 'बाबांना सोडू नकोस, ते तुला हात धरून चालवतील' अशा आश्वासक शब्दांत प्रोत्साहन दिले. आज श्रीबाबामहाराज पृथ्वीतलावर नाहीत याची वेदना या हृदयात तीव्रतेने सलते आहे. गीतलेखनाच्या कालात श्रीबाबांनी मला शेषशायी नारायणाच्या आणि तरुण ऋषिकुमार दत्तरूपाचे दर्शन घडविले, याची कृतज्ञ नोंद केली पाहिजे. देवीभक्त सौ. ललिताबाई मुळीक यांच्या देवीस्थानी 'श्रीसाई गीतायना'स आशीर्वादरूपाने श्रीगणेश व श्रीबाबा यांच्या मूर्तींचा प्रसाद (शून्यातून) नवनिर्मितीच्या रूपात लाभला, याचेही ऋण येथे मान्य करतो.

श्री. शांताराम आठवले यांची साक्षेपी प्रस्तावना म्हणजे या ग्रंथाचे भूषणच आहे. त्यांच्यासारख्या नामवंत कवी, संत, आध्यात्म व गूढ शास्त्रे यांच्या अभ्यासक, व्यासंगी व साक्षेपी टीकाकाराची रसज्ञ व अंतरंगस्पर्शी प्रस्तावना या गीतकाव्यास मोठ्या सौभाग्यानेच लाभली, ही बाबांची कृपाच होय ! प्रकाशकांनी गीतकाव्याची अंतर्बाह्य सुंदर सजावट करून 'श्रीसाईगीतायना'ला जनतेपुढे सादर केले, याबद्दल त्यांचा मी सदैव ऋणी राहीन. माझे मित्र व महाराष्ट्राचे तरुण प्रतिभावंत संगीतकार श्री. श्रीनिवास खळे यांनी या गीतकाव्याला स्वरारूढ करण्यास साहाय्य करण्याचे उदार अभिवचन दिले आहेच. या गीतायनाचे कौतुक करणाऱ्या इतर अनेक मित्रांचा व सहकार्यांचा स्थलाभावी येथे नामनिर्देश करणे शक्य नाही, त्यांनी मला क्षमा करावी.

मन, प्राण, बुद्धी व अहंकार यांच्या समर्पणासह श्रद्धा व शरणागतिमय भावनेचा नंदादीप श्रीनाथाच्या चरणी तेवत ठेवून येथे लेखणीला विराम देतो.

बी ५०/५ गव्हर्नमेंट क्वार्टर्स,
वांद्रे (पूर्व) मुंबई ५१

—**चकोर आजगांवकर**

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर श्रीसाईबावांच्या रूपाने श्रीपाद-श्रीवल्लभ नारायणांची दिव्य प्रेमशक्ती आणि अथांग करुणा महाराष्ट्राच्या या भूमीत साकार झाली. पंथ, धर्म, जात, आचार यांसारख्या या युगाला न मानवणाऱ्या भेदभावांना व कर्मकांडाला दूर सारून श्रद्धा आणि शरणागतीच्या महाद्वारातून तिने जीवनाला सरळ स्पर्श केला. तिच्या दिव्य लीलांचे, सूत्रमय वचनांचे व आगळ्या तत्त्वज्ञानाचे श्रीसाईगीतायन एक दर्शन आहे.

दिगंबराच्या दयाकृपेचे
फकिररूप हे कारुण्याचे
भक्तप्रेम हे शतकांमधुनी वाहे अपरंपार ! (गीत २ रे)

हा मुकुंद, हा माधव,
हा अनंत, हा केशव
हा सुरेश, श्रीनिवास, हा हरी, मुरारी ! (गीत १८ वे)

पूर्णब्रह्म रामकृष्णावतार
श्रीपाद श्रीवल्लभब्रह्माण्डाधार
किंवा श्रीशिवयोगी स्वानंदाकार
शंखचक्रधारी हरि शेषशायी ! (गीत २२ वे)

श्रीबावांचे पद जाणे—त्या संसारामधि काय उणे ?
भव कृतार्थ त्याच्या गुणगाने-त्रैलोक्य तयाच्या धन्य गुणे !
(गीत ३५ वे)

"तुझा मीच अन् माझा तू हा भर हृदयी संदेश"
मूर्तिमंत मी मोक्ष समोरी मीच मंत्र आदेश ! (गीत ३६ वे)

चकोर झाला शशिकर सुंदर
चंद्रहि बनला आज चकोर
समरसतेच्या पौर्णिमेत या सकल मुक्तिचे धाम ! (गीत ४१ वे)

## श्रीगणेश–वंदन

जय जय गणेशा, एकदंता । हेरंबा, भालचंद्रा, अनंता
मयूरेश्वरा अनाद्यंता । श्रीविघ्नराजा ॥ १ ॥

ज्यजय श्री पाशांकुशधरा । जयजय श्री वरदाभयकरा
मंदारमूला, दुर्वांकुरभरा । श्री स्वानंदनाथा ॥ २ ॥

सिंदुरवदना चतुर्भुजधरा । त्रिनेत्रभाला, लंबोदरा
मंगलमूर्ती, विधिजावरा । श्रीगणधीशा ॥ ३ ॥

ब्रह्मणस्पते, ज्येष्ठराजा । चिंतामणे, अधोक्षजा
कैवल्यखाणी, धुंडिराजा । श्रीविनायका ॥ ४ ॥

जयजय श्री प्रणवाकारा । मूळाधार चक्राधारा
शब्दब्रह्मात्मका, छंदाकारा । नमन तुजसी गणराया ॥ ५ ॥

सर्व मंगलाच्या कारणा । सकल दुरितांच्या निवारणा
सर्वार्थसिद्धींच्या साधना । ओंकाररूपा ॥ ६ ॥

जनक तुझा विश्वेश्वर । माता गिरिजा करुणाकर
ऋद्धिसिद्धींचा भ्रतार । स्वये तूचि गणेशा ॥ ७ ॥

निर्गुणाच्या मूळारंभा । सकलकार्यांच्या शुभारंभा
बुद्धिशक्तीच्या सौरभा । दरवळशी त्रिभुवनी ॥ ८ ॥

सुखकर्ता तू दुःखहर्ता । नुरविसी विघ्नांची वार्ता
आर्तपतितांचा त्राता । भक्तवत्सल परेश ॥ ९ ॥

सकळपुरुषार्थांच्या प्रेरका । सकळसिद्धींच्या कारका
दीनदुःखितांच्या तारका । तूचि देवा गजानना ॥ १० ॥

तू संतसज्जनांचा कैवारी । देवांच्याहि आपदा निवारी
तुजविण भक्तां कोण तारी । भवसागरामाझारी ॥ ११ ॥

त्रैलोक्यी मातले अपरंपार । जेव्हा असुरगण अनिवार
प्रकट होसी तेजोनिकर । विश्वपालन कारण ॥ १२ ॥

तूच सर्व कार्यांचा कर्ता । तूच एकला विश्वधर्ता
सकल आपदांचा हर्ता । श्री विघ्नेश्वर ॥ १३ ॥

तू वाङ्मय, तू चिन्मय । आनंदमय, तू ब्रह्ममय
केवळ सच्चिदानंदाद्वितीय । मूर्तिमंत परमेश्वर ॥ १४ ॥

तू ज्ञानमय, विज्ञानमय । विश्वाधार अद्वितीय
जगत्कारण अप्रमेय । प्रत्यक्ष जगदीश्वर ॥ १५ ॥

तू त्रिगुणांना अतीत । तू त्रिकालांनी अबाधित
शक्तित्रयात्मक परमदैवत । भक्तमानस हंस तू ॥ १६ ॥

तू मोरगावी मोरेश्वर । तू पालीचा बल्लाळेश्वर
सिद्धटेकींचा तू सिद्धेश्वर । श्री सिद्धिविनायक ॥ १७ ॥

महाडग्रामी तू वरदेश्वर । थेऊर क्षेत्री चिंतामणिवर
श्रीगिरिजात्मक करुणाकर । लेण्याद्री ग्रामी ॥ १८ ॥

ओझरक्षेत्री विघ्नेश्वर । रांजणगावी गणेश्वर
भक्तवरदायक निरंतर । अष्टविनायक स्वरूप ॥ १९ ॥

वाई, पुळें, टिटवाळा । चिंचवडग्रामी विराजला
चित्कळेचा सुखसोहळा । महागणपती तो तूची ॥ २० ॥

नच सरते भोगल्यावाचून । जन्मजन्मींचे संचित प्राक्तन
कटाक्षमात्रे करिसी दहन । दैवभोग भक्तांचे ॥ २१ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. २८५६६
शाखा

# १. आम्ही तुझे चकोर

प्रत्येक युगांत धर्माची प्रतिष्ठापना करण्यासाठी जन्म घेणाऱ्या भगवंतांच्या शंखचक्रधारी श्रीनारायणस्वरूपाची वैष्णवी प्रेमशक्ती प्रत्येक शतकांत भक्ताच्या अनुरागासाठीं अवतरत असते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर या शक्तीनें एक दिव्य आविष्कार घडविला. या प्रेमस्वरूप करुणेला जगानें '**श्रीसाईबाबा**' या नांवानें ओळखलें. ही अनादी अनंत प्रेमशक्ती आजही चैतन्यरूपानें अखंडपणें खेळते आहे. त्या प्रेमचंद्र श्रीसाईप्रभूंना भक्तचकोरांचें हें भावभक्तिमय आवाहन आहे.

तूं प्रेमचंद्र साई — आम्ही तुझे चकोर
कारुण्यचंद्रिकेत — आम्हा घडो विहार ॥ ध्रु० ॥
तूं प्रेमचंद्र साई

स्वानंदमेघ साई — आम्ही तुझे मयूर
भक्तीत अमृताची — तूं आत दिव्य धार
चैतन्य–सिंधु साई — आम्ही तरंगहार
बिंदूस सिंधु जाणे — नेणे जळा तुषार
तूं अर्थ जीवनाचा — तूं ज्ञानभक्ति – सार
तूं भक्ति – मुक्ति — शांती – सर्वस्व तूं अधार
तूं प्राण, चेतनाही — तू विश्व की अपार
तेजात न्हाणिसी तूं — अज्ञान अंधकार
संसार रंगभूमी — पात्रे लहान थोर
या विश्वनाटकाचा — तूं एक सूत्रधार
गोदावरीतटी तूं — वाहून भक्तभार
केलास सार्थ देवा — संसार हा असार
देवा, तुझ्या कृपेला — ना अंत, नाही पार
हो जन्म जन्म साथी — ना लाभ अन्य थोर

हा जीवभाव सारा — हा भावना-बहार
निर्माल्य त्वत्पदीचे — उद्धार, तार, मार
ज्योतीस ज्योत भेटो — प्रीतीस प्रीति धार
साईपदी वहावा — हा प्राण अग्रहार
तूं रुद्र विष्णु ब्रह्मा — तूं ब्रह्म निर्विकार
साक्षात् जगद्गुरू तूं — ने नाव पैलपार

## २. घेतसे निराकार आकार

असाच श्रीसाईप्रभू प्रेमस्वरूप आहे. या प्रेमचंद्राच्या कौमुदीचा ध्यास भक्तचकोरांना अखंड जडलेला असल्याने भक्तांच्या युगायुगांच्या ध्यासामुळे निराकाराला साकार व्हावे लागते. ते सनातन चरण या गंधवती वसुंधरेवर पुनः पुनः उमटतात.

अनन्ततेतुन उसळत येतो प्रणवाचा हुंकार
घेतसे निराकार आकार ॥ ध्रु० ॥

अमूर्ततेला मिळे शरीर
ब्रह्मानंदा ये आकार
असारतेतही भरते सार
अमरत्वास्तव झुरतो जेव्हा हा मृण्मय संसार....

जन्मजन्मीची अखंड प्यास
दिव्यत्वाचा धरिते ध्यास
प्रभूस आणिते आकारास
कालनदीच्या तटि उलगडती स्वर्गाचे प्राकार....

प्रलयकाल समरांत समोरी
हताश होतो पार्थ अंतरी
विनाश गर्जत येतो द्वारी
गीतेपरि मग गुंजत येते नवजीवन ललकार!

परित्राण करण्या साधूंचे
निवटाया सामर्थ्य खलांचे
उभवाया साम्राज्य नीतिचे
युगायुगांतून प्रभुवर घेती नवनव देहाकार....

दिगंबराच्या दयाकृपेचे
फकिररूप हे कारुण्याचे
त्रिताप वारी निजभक्तांचे
भक्तप्रेम हे शतकामधुनी वाहे अपरंपार....

जे शरयूच्या तटीं उमटले
कालिंदीच्या कुशींत रमले
वनवासी–प्रासादीं भ्रमले
दिव्य चरण ते पुनरपि करिती शिरडीतून पुकार!

## ३. प्रकटले साईरूप श्रीहरी!

दिक्कालातीत ब्रह्मांड-पसाऱ्यातून ओंकार-ध्वनि उमटतो. निर्गुणाला सगुण साकार व्हायची ओढ लागते. ते निराकार ब्रह्मतत्त्व भौतिकात अवतरताना योग्य स्थलकाल निवडते. साईप्रभूंनी आत्माविष्कारणासाठी भागवतधर्म जिचे स्तन्य प्याला त्या दक्षिणगंगा गोदावरीचा परिसर निवडला.

गोदावरिच्या तिरी–प्रकटले साइरूप श्रीहरी!

याच तटाकी जानकिजीवन
भक्तकल्पद्रुम श्रीरघुनंदन
वैदेहीसह वसले अनुदिन
गौतमीच्या कुलतिरी–लिलानट रामायण आचरी

ही नच गोदा–दक्षिणगंगा
वशिष्ठ-गौतम तीरे अंगा,
भागवतांच्या वरि सत्संगा
अद्वैताच्या घरी–भरितसे भक्तीच्या घागरी!

कुशावर्त कवळिते कुशीला
श्रीनाथांचे चरण उशाला
योगभक्तिची अंगि दुशाला
स्वानंदाची झरी–तमातून ज्योतिर्मय पथ वरी!

कृष्णातट श्रीमंत विरागी
दत्त-दिगंबर नृसिंह योगी
फकीर बनले मलंग जोगी
गोमतिच्या तटनिरी–त्रिमूर्ती मानववेषा धरी!

हा शिरडीचा फकिर अनोखा
नाव गांव गण गोत-पारखा
ऊर्ध्वमूळ पाताळी शाखा
जणु अश्वत्थापरी–अलौकिक सबाह्य अभ्यंतरी!

जटाजूट नच जीर्णवस्त्र शिरी
नसे कमंडलु लोहपात्र करि
भुकेस अर्धी पुरे भाकरी
भक्तभुकेला तरी–अवतरे अविनाशी नरहरी!

या देवाची तारक भक्ती
मातेहुनही वत्सल प्रीती
गुरूकृपा नच ही अनुरक्ती
विरक्त तरिही करि–भवातुन पैलपार उद्धरी!

या देवाला अखंड गावे
युगयुग याचे गुण वर्णावे
जन्मजन्म मी पदी वहावे
याच्या अधरावरी–रमावे होउनिया बांसरी!

हा अविनाशी दत्त दयाघन
पायाखाली अवघे त्रिभुवन
लीलामय करि नव तनुधारण
पावन शिरडी करी—तयाची गा गीते वैखरी !

## ४. ही शिरडी द्वारावती

पुण्यपावन गौतमीच्या तीरावरील अध्यात्म-पंढरी शिरडीशी श्रीसाई-बाबांचे जीवनचरित्र निगडित झाले आहे. साईप्रभूंच्या तेथील वास्तव्याने आणि त्यांच्या चरित्रलीलांनी तेथील कणन्कण सौभाग्याने नटला आहे. कृष्णावतारी सागरात बुडालेली द्वारकानगरी येथेंच होती. तसेच देव-दानवांच्या संघर्षमय समुद्र-मंथनाचे पौराणिक स्थान हेंच होते याची आठवण शिरडी जागृत करते.

ही शिरडी द्वारावती द्वारका हरीची
दिव्य पुरी कांचनमय श्यामसुंदराची ॥ ध्रु० ॥

विस्मरणी दडलेली
सिंधुजळी बुडलेली
ज्योतिर्मय वाट जणु मोक्ष-पंढरीची !

रत्नाकर या इथला
सुरअसुरांनी मथिला
अतलताच धुंडियली क्षीरसागराची !

ही रत्नाकर भगिनी
श्रीकमलेची जननी
भवसिंधूतुनि प्रकटे धार अमृताची !

या इथल्या मृत्तिकेत
सद्गुरुचे उमटे पद
मातीतुन वाट फुटे मुक्तिच्या घराची !

मृत्युलोक सीमेवर
स्वर्गाचे हे शिवार
गौतमिच्या मांडीवर मूर्ति कांचनाची !

गगन इथें श्यामसलिल
पवनातहि नित परिमल
पाण्याला ओढ इथे मोक्ष-सागराची !

हे खंडोबा मंदिर
हा शनिचा दिव्य पार
त्रिभुवन नित तारित ही समाधी गुरूंची !

ही मशीद, हे मंदिर
चावडि ही, निंबपार
शांत तपोवनि वसती आत्मजागृतीची !

चिद्घन श्रीसाइरूप
पूर्णब्रम्ह स्वस्वरूप
करुणाघन नित्य करी वृष्टि श्रीकृपेची !

## ५. शिरडीस साई आले

...आणि एके दिवशी द्वारावती द्वारकेत श्रीसाईप्रभूचे अचानक आगमन घडले. गोदावरीच्या काठी उमललेले हे आकाशपुष्प सद्गुरुव्यंकटेशांच्या (व्यंकुशहांच्या) गुरुकृपेचा स्वर्गीय परिमल घेऊन एका अद्भुत चमत्काराच्या पार्श्वभूमीवर शिरडीच्या गांवकुसावर प्रकट झाले. शिरडींत

आलेल्या बालसाईंचे खंडोबाचे पुजारी श्रीम्हाळसापती सोनार यानी "आवो साओीबाबा" या शब्दांत स्वागत केले–

सौभाग्य द्वारी आले – शतजन्म सफल झाले
शिरडीस साई आले – शिरडीस साई आले !

पसरून योगमाया – प्रभु बालरूप झाले
ते अष्टसिद्धि तेज – जन्मासवे उदेले
प्रभुचरण पाथरीच्या – पार्थीवतेत धाले !

भगवंत आत्मयोगे – वरितात बालवेष
तो धन्य धन्य वंश – तो धन्य धन्य देश
भूमीत या मराठी – प्रभु देहवंत झाले !

त्यागून मोहमाया – संन्यस्त मायबाप
गेले तपोवनात – शोधीत आत्मरूप
एका फकीर युग्मे – बाळास वाढवीले !

हा दिव्य बालयोगी – शोधी अरूप रूपी
श्रीचरण व्यंकुशांचे – जोडी गुरुस्वरूपी
भेटे नदी समुद्रा – शिष्यत्व सार्थ झाले !

शत धर्म, पंथ, जाती – येथे समत्व घेती
श्रद्धेसवे तितिक्षा – वर्षी अखंड शांती
सारे प्रपंचभेद – ज्ञानात दग्ध झाले !

यमुनातिरावरोनी – आला नवीन वारा
श्रीराम–रहिम दोघे – सोत्कंठ मीलनाला
निर्द्वंद्व भेदहीन – विणितो कबीर शेले !

एका तटी तरूच्या – हा बालयोगी होता
उघडून ज्ञानचक्षू – लक्षी भविष्यगाथा
कुणि मार्गभ्रष्ट घोडे – दृष्टीत दिव्य आले !

पाटील धूपगावीं — कुणी चांद नामधारी
धुंडीत अश्व आला — साधू बघे समोरी
करुणार्द्र त्या प्रभूने — त्याला कृतार्थ केले !

भूमी प्रहारिता ये — प्रत्यक्ष अग्निज्वाला
हाती चिलीम भरुनी — दे चांद पाटलाला
पाहून दिव्यता ही — आश्चर्य थोर झाले !

त्या पाटलाघरीची — शिरडीस हो सगाई
संगे विवाहमेळा — ये द्वारकेस साई
मार्तंड-मंदिराच्या — द्वारात ब्रह्म आले

मग म्हाळसापतींनी — सोत्कंठ स्वागतात
"या साई, या !" म्हणोनी — संबोधिला अनंत
जो नामरूपहीन — त्या नामि भूषविले !

श्रीचरण दिव्यतेचे — विश्वाकडे वळाले
सौभाग्यरूप ल्याले — शिरडीस साई आले
आध्यात्मजागृतीचे — सामर्थ्य सज्ज झाले !

## ६. वसतो न मंदिरी, ना वसतो मशिदीत

श्रीसाईबाबांच्या जीवननाट्याची नांदी खंडोबाच्या मंदिराच्या दारात म्हटली गेली. त्यांचे शिरडीतील पहिले पाऊल खंडोबाच्या मंदिराच्या पटांगणांत पडले. मंदिराचे पुजारी म्हाळसापती सोनार यांनी या तेजस्वी बालमूर्तीचे "आवो साई !" या शब्दांनी स्वागत केले. मस्तकावर फडके बांधणारा हा कफनीधारी साधू त्यांना मुसलमान अवलिया भासला. मंदिरात प्रवेश करताना म्हाळसापतींनी साईबाबाना प्रतिबंध केला. या प्रसंगी बाबांनी त्या अज्ञ भक्ताला ऐतिहासिक उपदेश-गाथा ऐकविली.

'या साई' म्हणोनी पुकारसी मज भगता!
या मंदिर–अंगणी पाऊल माझे पडता
विश्रांत पदे ही वळता उंबरठ्यात
का यवन म्हणून मज थांबविसी द्वारात?

करि त्रैलोक्याला पावन जो परमेश
त्या मलिन करिल का हा यवनाचा वेष?
तो यवन न हिंदु, नसे धर्मबंदिस्त
रे! जनक जगाचा भेदशून्य, निर्द्वंद्व!

कुणी राम म्हणावे अथवा रहिम म्हणावे
परि अभेदरूपे नित त्याने विलसावे
वसतो न मंदिरी, ना वसतो मशिदीत
प्रभु अखंड खेळे भक्तांच्या हृदयात!

तो विश्व व्यापुनी दशांगुळे वर उरतो
नच चार भिंतींच्या कारावासी रमतो
त्या धर्म नसे, नच पंथ, जात अज्ञात!
का चैतन्याला चैतन्याविण जात?

प्रभु निराकार त्या नसे एक आकार
आब्रह्मस्तंभ तो विलसे विश्वाकार!
त्या आदि नसे, नच मध्य, असेना अंत
तो अनाम असुनी नटतो नामि अनंत!

भक्तीतुन वाहे ओसंडत आनंद,
योग्यांच्या हृदयी स्फुरे अनाहत नाद,
ज्ञात्यांच्या अंतरि जो स्वानंद नितांत,
तो निरुपाधिक प्रभु, त्रिगुणांनाहि अतीत!

त्या पत्र नको, वा नको तोय, ना पुष्प
नजराणा प्रिय त्या हृदयाचा निष्पाप!
बुडवावे त्याला अथांग प्रीतिरसात
आपुले करावे हृदयाने प्रेमार्त!

चिरमंगल त्याला विटाळ कसला लागे?
चल ऊठ, तोड हे अज्ञानाचे धागे
झाडून काजळी चेतव दिव्य प्रभात
शिरडीतुन फुलवू जाणिव ही विश्वात.

## ७. मन वेडे दर्शनास रे तुझ्या भुकेले ....

खंडोबा-मंदिरप्रवेशापासून म्हाळसापतींनी बाबाना परावृत्त करण्याचा यत्न केला. परंतु शिरडीच्या वनावनातील त्यांचा अनिर्बंध संचार कोण अडवू शकणार? पानसावरीच्या बेटात, जंगलातील एकांतात बाबा अन्नपाण्यावाचून दिवसाच्या दिवस कडकडीत तपाचारात घालवीत. उन्हातान्हातून काट्याकुट्यांतून, आत्मानंदाच्या धुंदीत अनवाणी भटकणाऱ्या या बालमूर्तीबद्दल श्री. गणपतराव कोते पाटलांच्या पुण्यचरित पत्नी सौ. बायजाबाई यांच्या हृदयात मातृप्रेमाचा पाझर फुटला. आपल्या हातची भाकर बाबांना भरवल्यावाचून त्यांना अन्नाचा घास जात नसे. त्या माऊलीच्या प्रेमाने बाबांचे विरक्त मनही द्रवले!

मन वेडे दर्शनास रे तुझ्या भुकेले
वत्सलता तुजसाठी अंतरी उफाळे ॥ ध्रु० ॥

वणवणुनी रानिवनी
शोधियेले तुज विजनी
घास एक घेशिल जर भाग्य मम उजाळे ॥ १ ॥

भाग्यवती निज जननी
क्षणभर तू मज मानी
भाकरिसह भरविन मुखि, प्रीतिचे उमाळे ॥ २

दारुण तव तप बघते
मन माझे गहिवरते
अनुदिन मी कळवळते, दहिवरती डोळे ॥ ३ ॥

मूर्ति तुझी सान दिसे
दिव्य तेज मुखि विलसे
निंबातळी बिंब जणु दिप्तिचे उदेले ॥ ४ ॥

निग्रह तू मूर्तिमंत
वैराग्यच देहवंत
भाव परी अंतरंगि मृदुल मधुर खेळे ॥ ५ ॥

मिटली जरि नयनदळे
दृष्टिपुढे विश्व खुले
बळ सृष्टी विलयाचे अंग अंगि ठेले ॥ ६ ॥

ब्रह्म तूच बाळरूप
श्याम सगुण दिव्यरूप
वत्सलता की माझी या धुळीत चाले ॥ ७ ॥

प्रिय मज तू प्राणाहुन
तू अखंड सुखनिधान
रूप नयनि खेळविता, तनमन हे डोले ॥ ८ ॥

## ८. गौरवे गातिल हे प्राकार !

कै. सौ. बायजाबाई कोते पाटील यांच्या मातृहृदयातील वात्सल्यालाही बालसाईंचे अद्‌भुत सामर्थ्य उमगले होते. तर मग संत गंगागीर महाराजां-सारख्या ज्ञानी पुरुषाला ते तेज आकलन झाल्यावाचून कसे राहील ? शिरडी गावात संत गंगागीरांच्या हस्ते नामसप्ताह साजरा करू इच्छिणाऱ्या भक्तांस संत गंगागीरांनी सांगितले की, या गावात यापुढे नामसप्ताहाची आवश्यकता नाही. या गावी प्रकट झालेल्या बालसाधूच्या तपोबलाने

शिरडी गावास भारतातील महान तीर्थक्षेत्राचे स्वरूप येईल. हे प्राकार या महात्म्याचे गौरवगीत गातील—

गौरवे गातिल हे प्राकार
धन्य नगरि ही, धन्य नागरिक, धन्य धन्य परिवार !

पुण्य वृक्षवर, पावन वेली
पुण्य पथावर, पावन धूली
वनोवनी मंगलता भरली
घरी मंदिरी मंगलतेचा एकच आविष्कार !

या शिरडीच्या क्षितिजकडावर
दिव्य उगवला प्रकाशभास्कर
संत प्रवर नच अमृतनिर्झर
मोक्षनगरिचे फकिररूप हे विभववंत सरकार !

हा तेजाचा पूर अनावर
उजळी इथली पर्णकुटी, घर
जिवाजिवांना शिवतेचा वर
चैतन्याच्या समूर्ततेचा सदेह साक्षात्कार !

तेज तपाचे दिव्य मुखावर
पुण्याईचा अथांग सागर
की अध्यात्मच देहाकार !
आत्मज्योत ही युगायुगांचा उजळ करी अंधार... !

शिरडीची ही पावन धूळ
दाही दिशांचे उजळिल भाळ
शिर विश्वाचे विनम्र होईल
या गंगाजळि होईल अवघा जीवनमय संसार !

## ९. काकडे स्नेहाविण जळती

卐卐卐卐 卐卐卐❋卐卐卐卐卐卐卐

शिरडीचे प्राकार भविष्यकाळात श्रीसाईप्रभूंचा महिमा गात राहतील हे संत गंगागीर महाराजांच्या द्रष्ट्या दृष्टीला दिसले! त्याच वेळी शिरडीच्या "द्वारकामाई" मशिदीत बाबा सामान्य जनांच्या चर्मचक्षूंना आपल्या दिव्य आत्मतेजाचा हळुहळू प्रभाव दाखवीत होते. पौराणिक काळातील कृष्णाच्या सोन्याच्या द्वारकेतील रत्नदीपांच्या आरासीची एक आठवण म्हणून हा "द्वारकाधीश" फकीर शिरडीतील घराघरातून, दुकानातून तेलाची भिक्षा मागे व द्वारकामाईत दीपोत्सव साजरा करी. हा महाग दानधर्म शिरडीकरांस एक दिवस रुचला नाही. बाबांना तेलाची भिक्षा नाकारण्यात आली — आणि मग —

उजळता दिव्य आत्मज्योति — काकडे स्नेहाविण जळती
जळांतुन पाजळती ज्योति — प्रभूंची अद्भुत ही रीती ।। ध्रु० ।।

साईंची दीपावर प्रीति — मशीदित दीपोत्सव करिती
भिजवुनी चिंध्यांच्या वाती — द्वारका उजळतात रात्रीं

फिरती वणवण दारात — प्रार्थिती द्यावि तेलवात
तमिस्रा भरता दिक्प्रांती — दीपिका तमगर्भी जळती

शिरडीचा हा प्रकाश वेडा — पार करि जन्माचा वेढा
जाणिती अज्ञ काय महती ? — व्यर्थ हा खुळेपणा गणिती

"नसे हा धर्म, नसे दान — पुरे ही भिक्षेवर चैन"
जनांची उफराटी हो मती — प्रभूंना भिक्षा नाकारिती

जगाचा जो विरक्त स्वामी — पडावे त्याला काय कमी ?
मुखावर अविच्छिन्न शांती — पदाशी कमलेची वसती !

प्राशिले पात्रातील पाणी — भरले उरले पणत्यांतुनी
भिजविल्या जळामध्ये वाती — प्रज्वळे ज्योतीतुन ज्योती

पेटली पणतीवर पणती — चेतली आत्म्यावर दीप्ती
प्राशुनी आपतत्त्व वाती — रात्रभर तेजदान देती

उजळता दिव्य आत्मज्योती — काकडे स्नेहाविण जळती
जळांतुन पाजळती ज्योती — प्रभूंची अद्‌भुत ही रीती

## १०. वाहत मी भक्तांचा नित्य कष्टभार!

श्रीबाबांच्या आत्मतेजाचा स्पर्श होताच पणतींतील वाती तेलावाचून ज्योतिर्मय बनल्या. अशा प्रसंगामुळे बाबांच्या सामर्थ्याचा प्रकाश हळुहळू सर्वत्र पसरू लागला. द्वारकामाईजवळीलच शिरडीतील एका शाळेतील शिक्षक श्री. माधवराव देशपांडे हे हळुहळू बाबांच्या तेजामुळे त्यांच्याकडे आकृष्ट झाले. त्यांची बाबांशी सख्य-भक्ति केवळ अलौकिकच होती. बाबा त्यांना प्रेमाने 'शामा' म्हणत. एकदा या शामाला बाबांनी नवविधा भक्तीचे रहस्य सांगितले.

श्यामा, हे सांगू तुला काय लाखवार?
वाहत मी भक्तांचा नित्य कष्ट-भार ॥ ध्रु० ॥

या धुनीत मजसमोर
जागृत नित वैश्वानर
अग्निसाक्ष गर्जे ही द्वारका त्रिवार!

गाता मम गीतकथा
हरिन सकल दुःखव्यथा
वर्षिन निज भक्तावर शांतिसुख अपार....

मत्स्वरूपी रत झाले
माझेपणी जे विरले
ते विदेह, शिरि माझ्या तत्प्रपंचभार!

मी त्यांच्या ध्यानिमर्नी
जागृतीत वा शयनीं
प्रगटुनिया वाहतसे भक्ति-प्रेम-पूर

रंगतात मम नामीं
गुंगतात मम प्रेमी
भक्त ते अनन्य मला प्राणाहुन प्यार !

भक्तकार्य-कल्पद्रुम
मी करुणा अमृतोपम
मीच मंत्र मृत्युंजय, मीच मोक्षतीर !

ही मशीद जो चढेल
भवसिंधू तो तरेल
शांतीचे दाखवीन त्यास अपर तीर....

निंबातळि धूपदीप
हरिल सकळ पापताप
मधु पल्लव वारितसे दुःख दुर्निवार !

## ११. भूतांत भासुं दे भगवंताचे भान !

द्वारकामाईत अखंड धगधगणाऱ्या धुनीतील अग्निनारायणाच्या साक्षीने द्वारकाधीश श्रीसाईबाबांनी आपल्या दिव्यत्वाचे रहस्य आणि द्वारकामाईचे स्थानमाहात्म्य निःसंदिग्ध शब्दांत त्यांचे एक भक्तश्रेष्ठ माधवराव देशपांडे यांचेसमोर प्रकट केले. माधवरावांची सख्यभक्ती एवढ्या श्रेष्ठ दर्जाची होती की त्या भक्तवत्सल प्रभूने केवळ प्रेमभावाने त्यांना भक्तीचे सारसर्वस्व विशद केले. दुसरे ज्ञानी व जिज्ञासु भक्तवर कै. नानासाहेब चांदोरकर बाबांना अत्यंत प्रिय होते. एकदा नानांना जीवनाचे व कर्तव्यकर्माचे दिव्य तत्त्वज्ञान कथन करताना श्रीबाबा स्नेहाळपणे म्हणाले :

हे जीवन आहे अखंड मरणाधीन
मृत्युंजय आत्मा आदीअन्त-विहीन ॥ ध्रु० ॥

हे आले कोठुन स्वजन-आप्त-धन-दारा ?
वासना निर्मिते सारा क्षणिक पसारा
या देहापुरता केवळ स्वप्नपिसारा
तृष्णेत जन्मते जन्म-मरण-अज्ञान !

मिथ्याच असे हा क्षणभंगुर आभास
सत्याचा नसतो लवहि यांत अधिवास !
प्रारब्धच करिते चंचल पदविन्यास
उसळती मिसळती लाटा उन्मेखून

ही अनंत रूपें धरिते ममता-माया
अज्ञानच केवळ वरिते अद्भुत काया
कर्तेपण घेतो अजाण मानव वाया
निर्मिते अहंता कर्माचे विंदान

तूं ठेव प्रभूच्या चरणी अनुसंधान
अर्पून तयाला मोह-लोभ-अभिमान
कर्तव्य आचरी, नको आत्मसन्मान
ज्ञानात विरूं दे कर्त्याचा अभिमान !

तूं रूप प्रभूचे पहा अणूरेणूंत
समसाम्य दिसूं दे सुवर्णांत-मातीत
ना धरीं फलाशा-लोभबुद्धि कर्मांत
भूतात भासुं दे भगवंताचे भान !

## १२. उदी ही घ्या भाळा चर्चुन !

कै. नानासाहेब चांदोरकरांना जीवन-तत्त्वज्ञान सांगताना देहाची नाशवंतता, आप्तस्वकीयांची मायावी नाती, ममत्वाची भ्रामक माया आणि अहंकर्तृत्वाची फोलता यांचे मर्म श्रीबाबांनी प्रकट केले. या त्रितापदग्ध मिथ्या संसारास मृत्यूच्या स्मरणानेच जाग येते, याचा संदेश

द्वारकामाईमध्यें अखंड जळणारी त्यांची पवित्र धुनी देत असे. त्याच धुनीतील रक्षा ते दर्शनार्थी भक्त व आर्त यांना प्रसादरूपानें देत असत. ही उदी संसारवासनालिप्तांना देहाच्या अंतिम गतीचे स्मरण करून देई, तर परमेश्वरप्राप्तीसाठी आतुर झालेल्या मुमुक्षूंना मरणातल्या मृत्युंजय अमरत्वाची आठवण करीत असे! आर्तांना ती आर्तिनाशक ठरे, तर व्याधिग्रस्तांना निरामयतेचे दान करीत असे! उदीचा महिमा सांगताना श्रीबाबा म्हणत—

राख पसाभर नरदेहाची, नश्वर दारा धन....
धुनी ही सांगे रात्रंदिन ।
मरणामधल्या अमरपणाचे ज्योतिर्मय दर्शन
उदी ही घ्या भाळा चर्चुन ! ॥ ध्रु० ॥

भस्म न हे मृत्युंजय जीवन
कृष्णसख्याचे प्रेमनिर्बंधन
द्वारकेतले रक्षाबंधन
मृण्मयतेतील दिव्यपणाची ही प्रतिमा चेतन ॥

आसक्तीचा चिरसंग्राम
पंचविषय हे इंद्रियग्राम
पंचत्वातच घेई विराम
या भस्माच्या कणी अखंडित भगवद्गुण गायन ॥

मशीदमाईची ही माया
"मालिक अल्ला"ची ही किमया
फकीर प्रभुची दिव्यता दया
वैकुंठीच्या प्रेममयाचे हे प्रीतीबंधन ॥

भवतापाचे तारणवारण
या विभुतीचे पुण्यविलेपन
आत्मसुखाचे की अभिसिंचन
हे मायेचे आत्मविसर्जन, अमृताचे सिंचन ॥

हे स्वर्गाचे क्षितिज मोकळे
की मोक्षाचे पीक कोवळे
ही प्रेमाची सरिता खेळे
जिवाशिवाच्या एकपणाचे पैलतटीचे धन ॥

## १३. अष्टसिद्धिंनो, गा हलके ग अंगाईगीत..

卐卐卐卐 卐卐卐

श्रीबाबांनी आपल्या प्रतीकात्मक भाषेत नवविधाभक्ति, ज्ञानकर्मयोग आणि दैनंदिन जीवनाचे (प्रेममय, प्रकाशमय, ज्ञानमय आणि आनंदमय) भगवंताशी नाते जोडणारी दिव्य विभूती यांचें माहात्म्य वारंवार सांगितले. बाबांची दिव्यता व विश्वात्मक चैतन्याशी असलेली अखंड एकरूपता यांचे दर्शन त्यांच्या प्रत्येक कृतीतून प्रकट होई. नवनिधि त्यांच्या पायाशी लोळण घेत. अष्टसिद्धींचा त्यांच्याभोवती जागता पहारा असे. बाबांची रात्रौ मशिदीतील निजण्याची पद्धतही अत्यंत विलक्षण असे. द्वारकामाईच्या आढ्याला फाटक्यातुटक्या चिंध्यांनी बांधलेल्या एका लाकडाच्या फळीवर बाबा झोपत असत. आढ्यापर्यंत बाबा कसे चढून जात, ती फळी रात्रभर बाबांच्या शरीराचे ओझे केवळ चिंध्यांच्या आधारावर कशी सहन करीत असे, बाबा फळीवरून कधी व कसे खाली उतरत हे कुणाला कधीही समजू शकले नाही. जणू अणिमा, लघिमा आदि अष्टमहासिद्धी बाबांना आपल्या अद्‌भुत योगनिद्रेवर प्रेमाने आरूढ करीत व अंगाईगीत गात त्यांना जोजवीत ! अष्टसिद्धींनों तेच दिव्य अंगाईगीत फिरून मृदु स्वराने आळवा. योगेश्वर शांतपणे पहुडले आहेत.

अष्ट सिद्धिंनो गा हलके ग अंगाई-गीत
तुमचा स्वामी योगेश्वर क्षण विसावला शांत ॥ ध्रु० ॥

निरुंदशा सानुल्या फळीवर
योगविनिद्रित श्रीजगदीश्वर
दीपक जळती चौबाजूंवर
हिंदोळ्यावर चिंध्याच्या प्रभु निजले विश्रांत ॥

 卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐卐

कुणा न कळले कधी श्रीहरी
विसावले वर असे अधांतरि
अतांच होते उभे भूवरी
कशी कळावी अलौकिकाची लौकिकास मात ? ॥

अखंड जागृत द्वारावति ही
ऐके तुमचे स्वर अंगाई
पर्यंकावर निजले साई
चार भिंतिचा खडा पहारा जागवि एकांत ॥

गहन निशेची नितांत शांती
चार दीप कोनात तेवती
रामनाम जप प्रभु हृदयांती
मिटल्या नयनापुढती उघडे अवघे दिक्प्रांत ॥

सकलसिद्धिंनो, तुमचा स्वामी
रंगा त्याच्या रूपी नामी
उधळा अद्‌भुत महिमा व्योमी
प्रकाशगीतामधून उजळा गगनातील ध्वांत ॥

## १४. मागती भिक्षा भगवंत....!

श्रीसाईबाबांचे मशिदीतील अद्‌भुत शयन हे अत्यंत आश्चर्यकारक होते. पाण्याने पणत्या पेटवण्याहूनही हा अत्यंत विस्मित करणारा दिव्य चमत्कार होता. विश्वात्मक शक्तिसामर्थ्याचा तो एक सहज आविष्कार होता. फाटके तुटके नेसणाऱ्या, ना हिंदु ना मुसलमान भासणाऱ्या गरीब फकीराचे ते अमीरालाही लज्जित करील असे सिद्धिवैभव होते! असे हे दैवी संपदेने परिपूर्ण प्रभू दुपारच्या वेळी शिरडीतील घरोघरी भिक्षाटनासाठी बाहेर पडत असत. प्रत्यक्ष कल्पवृक्षासारखा उदार दाता असलेली ही विभूति कोरभर भाकरीची का भिक्षा मागत असे ? नाही. बाबा दारोदारी

हृदयाचे प्रांत धुंडीत हिंडत असत. धन्य ते भाग्यवंत गृहस्थाश्रमी, की ज्यांनी या भिकारी भगवंतांच्या झोळीत आपल्या सर्वस्वाचे आनंदानें, प्रेमाने आणि मुक्तहस्ताने दान केले—

अलौकिक घडे लौकिकात — मागती भिक्षा भगवंत ॥ ध्रु० ॥
कुबेरच ज्यांचा भांडारी
इंदिरा चरणी वास करी
पसरिती भिक्षेस्तव हस्त — भिकारी लक्ष्मीचे कांत
धरोनी हाती चौपदरी
हिंडती हरी घरोदारी
धुळीनें व्याप्त आसमंत — तुडविती अनवाणी पंथ
कोरभर वाढा गे भाकरी !
प्रार्थिती घरोघरी श्रीहरी
अमीरी फकीरवेषात — घडविते अघटित शिरडीत
रेखिती भाळी कर्मरेख
मारिती रेखेवर मेख
जगाचे स्वामी श्रीमंत — याचना करिती दारात
भुकेल्या जगताची आर्ती
मिरविते ही करुणामूर्ती
ब्रह्म हे खडे मूर्तिमंत — जाणती एक भाग्यवंत
स्वये प्रभु कल्पवृक्ष साक्षात
उभे हे द्वारी दैववशात
काय त्या भाकरीची खंत — धुंडिती हृदयाचे प्रांत
जगाचे धनी महोदार
काय त्या देतिल दातार ?
भक्तिची लावुन फुलवात — समर्पा अंतर प्रेमानं !
असा क्षण फिरुनी परते न—
करावे सर्वस्वच दान !
बुद्धि, मन, अहंकार, चित्त — वहावे चरणि कृपावंत

# १५. कमलावर श्रीपति की रंक तूं फकीर?

卐卐卐卐 卐卐卐卐

शिरडीत भक्तांसाठी प्रत्यक्ष भगवंतांनी भिक्षावृत्ती स्वीकारली. असे दिव्य विरोधाभास श्रीबाबांच्या जीवनात प्रकर्षाने भरलेले होते. लक्ष्मीच्या पतीने कोणती भिक्षा मागावी? जगाच्या महोदार स्वामींना भक्तांच्या प्रेमार्त अंतःकरणाची भिक्षा हवी होती. बुद्धि, मन, देह आणि अहंकार यांच्या चतुःसीमांचे त्यांना समर्पण हवे होते. शरणागती आणि श्रद्धा यांचे दान बाबा याचित होते. बाबांचे जीवन सूचक, मिताक्षरी, अर्थपूर्ण, उपदेशाने, करुणेने आणि चमत्कारिक विरोधांनी भरलेले होते! त्यांचे व्यक्तित्व व वर्तन लोकांच्या तर्कात, अपेक्षांत सामावत नव्हते! त्यांनी मशिदीत घंटा आणि अग्निवेदी उभारली होती. एका स्थळी स्वस्थ बसून ते विश्वाला स्पर्श करीत असत. रुद्रावतार धारण करून संयमाचे धडे देत. दक्षिणाद्रव्य मागत पण कपर्दिकही जवळ बाळगत नसत. त्यांचे भिक्षान्न कावळे, कुत्रे, गोरगरीब कुणीही सेवन करीत. उरलेसुरले बाबा स्वीकारीत. त्यांनी ग्रंथ लिहिले नाहीत. उपदेशात्मक प्रवचने झोडली नाहीत. तरी त्यांच्या मौनात आणि विक्षिप्त कृतीत वेदांत आणि ज्ञान ओसंडे. द्वारकामाईत प्रवेश करणारा कुणीही सश्रद्ध भक्त बाबांना पाहून स्तिमित मनाने उद्गारत असे—

कमलावर श्रीपति की रंक तू फकीर?
निर्धन तू याचक की भूपती अमीर? ॥ध्रु०॥

भिक्षेस्तव चौपदरी
अनुदिन धरितोस करी,
करकमली कनक-झरी
चरणाशी कमला का नांदते अपार?

ही न मशिद, ना मंदिर
घुमत नित्य घंटास्वर,
धगधगते धुनि समोर,
सर्व धर्मसंमीलन पंथ हा कबीर!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं० शाखा (स्थळ प्रत)

जीर्ण एक अंगि कफनि,
शयन-आसनी धरणी,
अपुरे परि जग भ्रमणी !
विश्वरूप संचरसी दिशाकाल पार !

आब्रह्मस्तंभ उभा
मशिदीतून स्पर्श नभा !
दिव्य भक्ति प्रेम-प्रभा
स्थिरचर जग व्याप्त, तुझा त्रिभुवनी विहार !

स्पर्शि अन्न क्षुधित श्वान !
आप्त तुझे आर्त दीन,
करुणेस्तव चरणि लीन....
भूतीं भगवंत दिसे, समदृष्टी थोर

स्मित मोहक विष्णूचे,
ज्ञानसत्त्व ब्रह्म्याचे,
कधि तांडव रुद्राचे....
उरि अखंड करुणेची तुझ्या दुग्धधार !

एक देशी जरि आसन,
दिक्कालहि अडविती न !
सकलहृदय-संवेदन,
जाणिसि तू सकलांचे व्यथा-मर्मसार

साधुनिया तप महान,
योग, समाधी, आसन,
मुक्त करिसी मोक्षदान,
अमृत तुझ्या भक्तासव, प्राशिसी विखार !

अचलता न सिंधूला....
स्थिरता नच भूमीला....
ऋजुता नच चंद्राला....
तुजसम तूं, मूर्तिमंत मुक्तिशांतिधीर !

## १६. स्थिरचर सृष्टीवरी, निरंकुश सत्ताधारी हरी

卐卐卐卐

श्रीबाबांचा विरोधाभासांनी नटलेला अद्भुत जीवनक्रम सर्वांच्या कौतुकाचा व कुतूहलाचा विषय होता. सिद्धीवैभवाच्या पहाऱ्यात वावरणारे ते मूर्तिमंत वैराग्यच होते! फाटके तुटके नेसणारा, तरटावर बसणारा, अनवाणी फिरणारा, भिक्षान्नावर राहाणारा हा वेडा लहरी फकीर ब्रह्मांड व्यापून बसला होता! त्याच्या संचाराला दिशा व काळाच्या सीमा अपुऱ्या होत्या. तरीही देहाने तो जीर्ण द्वारकामाई मशिदीचाच निवासी असे. मशिदीतूनच तो स्थिरचरजगताला पाहात होता, स्पर्शत होता, आपल्या आज्ञेत वागवीत होता! योगाच्या उच्च आनंदावस्था गाठूनही भक्तांना केवळ प्रेमभक्ती व अखंड अनुसंधान यांशिवाय अन्य मार्ग श्रीबाबांनी उपदेशिला नाही. त्यांचा ज्ञान, कर्म व योग हा भक्तीशी एकरूप होता. ईश्वराची सर्वशक्तिमानता, सर्वदर्शित्व व सर्वस्पर्शित्व ही गुणवैशिष्ट्ये बाबांच्या ठायी एकवटली होती. एकदां शिरडीचा परिसर प्रचंड झंझावाताच्या व घनघोरवृष्टीच्या तडाख्यात सापडला असता, द्वारकेच्या चतुःसीमातून बाबानी पंचमहाभूतांवरील आपले प्रभुत्व प्रकट केले.

स्थिरचर सृष्टीवरी — निरंकुश सत्ताधारी हरी ।। ध्रु० ।।

तम काजळला आला दुर्दिन
वादळवारा गहन तुफान
तडिल्लतेचे नभात नर्तन
द्यावापृथ्वीवरी — रुद्र जणु प्रलय-तांडवा करी!

कडाडते रेषा मरणाची!
मुसळधार वर पर्जन्याची
विश्वाच्या घटि संहाराची
थरकांपत अंतरी — स्थिरेना धरणी आसावरी!

गुरेवासरे, पशुपक्षीगण
जलमय झाले अवघे जीवन
कंठी रुद्ध भक्तांचे प्राण
आळविती वैखरी — 'प्रभो, या आक्रांता आवरी'

विरघळला तो देव दयाघन
द्रवले आर्तांसाठी प्रभुमन
नभाकडे स्थिर डोळे रोखुन
तटस्थसे क्षणभरी — राहिले मशीद्-धारेवरी

गिरागजर मग उठे तारस्वर
डळमळले क्षण मशीद्-मंदिर
स्वयें उठविती प्रभू पुकार
विश्वच कांपे उरी — उमटला निनाद वरुणाघरी !

गर्जत उठला अद्भुत साद
वरुण नम्र हो, दे प्रतिसाद
वायु विसरला झंझानाद
पर्जन्या सावरी — इंद्रही वज्राला आवरी

विसावले मंथरले जीवन
खुले नभांगण, शांत समीरण
सजीव झाली सृष्टी कणकण
प्रशांतरूपा धरी — पुन्हा प्रभू शांतिब्रह्मता वरी

## १७. लंघती प्रभु दिग्बंध....

## अज्ञांस दिशांची भ्रांती !

शिरडीचे श्रीहरि द्वारकाधीश साईप्रभू चराचरावर सत्ता गाजवीत होते. त्यांच्या इच्छेचे सामर्थ्य केवळ जिवंत प्राणिमात्रापुरते मर्यादित नव्हते तर पंचमहाभूतांवरही त्यांची निरंकुश सत्ता चाले. शिरडीतील त्या गहन तुफानात, झंझावादळात बाबांनी वायु, वरुण आणि इंद्र यांना आपल्या आज्ञेत वागावयास लावले. एकीकडे प्रेमाचे, भक्तीचे, कारुण्याचे भावबळ तर दुसरीकडे अलौकिक सामर्थ्यसत्तेचा आविष्कार, असे हे द्विविध

व्यक्तिमत्व धारण करणारे! मूर्तिमंत प्रेम, ज्ञान, कर्म व योग बाबांच्या रूपाने शिरडीच्या पथावर चालत होते! अद्‌भुत महिमा, अघटित लीला आणि अतर्क्य सामर्थ्य यांची ही आणखी एक कथा ऐका. सर्वसाक्षित्वाची, सर्वस्पर्शित्वाची आणि सर्वशक्तिमत्तेची कथा.

एका लोहाराची पत्नी भाता फुंकीत असता तिच्या कडेवरील तान्हे एकाएकी आगीत पडले. द्वारकामाईत बाबा देहाने वावरत असले तरी त्यांच्या कृतींना देहाची, काळाची अन्‌ दिशांची बंधने अडवू शकत नव्हती. करुणामूर्ती बाबांनी एकाएकी समोरच्या पेटत्या धुनीत हात घातले. आणि—

हा स्वामी अंतर्यामी — ही केवळ करुणामूर्ती ॥ ध्रु० ॥

प्रभु सर्वांभूतीं वसती — त्या कळे जगाची आर्ती
येतांच हाक भक्ताची — कारुण्य-कंप हृदयांती
वेदना व्यथा आर्तांची — स्पंदते जणू प्राणांती

कुणी कांता लोहाराची — फुंकीत करानी भाता
सानुले कडेवर होते — कर्तव्य जणु दुजा हाता
धगधगल्या होत्या ज्वाळा — जणू जिव्हा लाल लवथवती

निज जीवनकलहासाठी — करि ज्वाळांशी ती खेळ
निववाया हाक भुकेची — दो घासांचा हा मेळ
पति तिचा श्रमे दिनरात — उदराची करण्या पूर्ती

फुंकता अखंडित भाता — डबडबली घर्मे होती
क्षण विसावली ती दयिता — केव्हांची श्रमली होती
सोडिला दीर्घ सुस्कारा — मनि विचारास ये भरती

ती पोर सानुली बाळ — निज बाल्यातहि ये ज्ञान
तिळभरही हट्ट तिचा ना — दारिद्र्य करी सज्ञान
पाजिला जरासा पान्हा — कुरवाळित किंचित प्रीती

क्षण विश्रमता तो अग्नि — ये हांक पतीची कानी
लगबगिने उठली कांता — उचलुनिया पोर करानी
करि प्रदीप्त वन्ही फिरुनी — तेजात निखारे जळती

परि एकाएकी हंत — विसरली भान अवधान
निसटली करातून कन्या — घे अग्नी आकर्षून
ती वत्सलता मातेची — भरि आसमंत आकांती

शिरडीत धुनी धगधगती — प्रभु होते न्याहाळीत
भडकली आग एकाकी — उसळला ज्वाळ गगनात
ये हाक प्रभूंच्या कानीं — कळवळे दयेची मूर्ती

घातला हात ज्वाळेत — उचलले करानीं काही
ग्रासिला हात वन्हीने — वेदना उमटली नाही
तो प्रेमळ आविर्भाव — क्षण तटस्थ सारे बघती

भानावर आले भक्त — वारिती प्रभूचे हस्त
स्मित प्रसन्न वदनावरनी — जणू घडले नच अघटित
तिळ व्यथा नसे शब्दात — दग्धना वाहती हस्ती

हा औट देह मातीचा — मातीतच त्याचे स्थान
कुरवंडुन पंचप्राण — वाचविती जीव अजाण
वाचला जीव पोरीचा — अग्निची जाहली शांती

जरि देहाने शिरडीत — तरि मुक्तच त्या दिग्प्रांत
शिरडीत जळाले हात — ती पोर दूर देशांत
लंघती प्रभू दिग्बंध — अज्ञास दिशांची भ्रांती !

## १८. शेषशायी नारायण शंखचक्रधारी

श्रीसाईप्रभूंनी पेटलेल्या धुनीत हात घालून त्या लोहाराच्या कन्येला प्रज्वलित अग्नीच्या ज्वालातून बाहेर काढले. बाबांची कृती शिरडीतील द्वारकामाईच्या चार भिंतीच्या मर्यादात घडली तरी तिचे परिणाम शेकडो मैलांचे अंतर त्या क्षणी तोडून दूर देशातील लोहारकन्येच्या प्राणरक्षणात रूपांतरित झाले. परमात्म्याच्या स्वरूपाशी एकरूप झाल्यावर घडणारी कृती काल-दिशांनी मर्यादित राहात नाही. श्रीबाबांचे विभूतिमत्त्व कोणत्या

दिव्य स्वरूपाशी एकात्म होते ? खरोखरच श्रीबाबा होते तरी कोण ? हा प्रश्न द्वारकामाईत प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाच्या मनात उठे. कुणाला ते राम स्वरूप भासत, तर कुणाला शिवस्वरूप. कधी कृष्णाच्या रूपाने तर कधी रुद्ररूपाने ते प्रकट होत. आर्त, अर्थार्थी, ज्ञानी, जिज्ञासु या सर्वांना त्यांच्या श्रद्धेनुरूप बाबा दिसत. परंतु एखादाच द्रष्टा पुरुष त्यांचे खरे स्वरूप जाणत असे. कै. नानासाहेब डेंगळ्यांना त्यांनी सत्यस्वरूप दर्शविले होते. दासगणूंना त्यांच्या चरणातून गंगेचे दर्शन घडले. बाबांचे खरे स्वरूप सप्तलोकांना आधार देणाऱ्या त्या त्रिभुवनचालक आणि पालक पुराणपुरुष वैष्णवीशक्तियुक्त श्रीमहाविष्णूचे म्हणजे श्रीपादश्रीवल्लभांचे होते. प्रस्तुत गीताची रचना श्रीबाबांच्या प्रत्यक्ष शेषशायी स्वरूपाचे दृष्टांत-दर्शन झाल्यानंतर स्वयंस्फूर्त घडलेली आहे.

मनमोहन श्रीसाई द्वारकाविहारी
शेषशायी नारायण शंखचक्रधारी ॥ ध्रु० ॥

हा मुकुंद, हा माधव
हा अनंत, हा केशव
हा सुरेश, श्रीनिवास, हा हरी, मुरारी

मकरकुंडले कानी
किरिट हिरण्यमय मूर्ध्नी
कमलनयन श्यामवदन इन्दिरा-विहारी

वैजयंति माळा उरि
कमला श्रीचरण चुरी
लांछन श्रीवत्साचे मिरवी युगे चारी

पुरुषोत्तम हा पुराण
पद्मनाभ मधुसूदन
आदिपुरुष ज्योतिर्मय दिव्यरूपधारी

हा भास्वान नारायण
तेजाचे तनु-धारण
वेदपुराणे गाती नित्य दिव्य थोरी

हा वेदांचे कारण
सुजनांचे आधारण
धर्मास्त्र चक्रपाणि रणी साह्यकारी

जागृत नित योगशयन
करुणामय हृद्‌यनयन
भक्त गजेन्द्रास्त्र घे संकटी भरारी

श्रीविष्णू हा वत्सल
विश्वंभर लोकपाल
सत्य-धर्म-प्रीतीची अंतरी थरारी

सकल रूप-गुण-निधान
अघनाशन भवतारण
विश्वाच्या आधारा सिद्ध भुजा चारी

भक्तहृदय "द्वारके"त
राजा हा अनभिषिक्त
युगयुग साम्राज्य करी प्रेम दंडधारी

योग भक्ति साधन धन
हा अखंड सुखनिधान
हे शरण्य शेवटले मोक्षरूपधारी

श्यामल कधी राम दिसे
प्रलयंकर शिव भासे
वल्लभ श्रीपाददत्त तिन्ही लोक तारी

## १९. माधवा, अद्‌भुत हें सरकार !

श्रीबाबा आपल्या ज्ञानी भक्ताला आजही आपले श्रीविष्णुस्वरूप किंवा वैष्णवी नारायणी शक्तिमय स्वरूप दाखवतात. हे रूपरहस्य ज्यांनी हृदयात ठसविले, ते खरोखरच धन्य होत ! पूर्वावतारी बाबा युगयुगात

प्रकट झाले, त्या त्या वेळी या वैष्णवी रूपाशी त्यांचे तादात्म्य प्रकट झाल्यावाचून राहिले नाही. कृष्णमय झालेले पूर्णब्रह्म शुकमुनि, आदिनाथांच्या रूपाने प्रकट झालेले जगद्‌गुरू महेश्वर, तेजोमय साक्षात्काराचे गीतात रहस्य गुंफणारे रामभक्त कबीरदास अशा विविध स्वरूपांत ही वैष्णवी शक्ती शतकाशतकांत प्रकट झाली.

परंतु सच्चिदानंद सद्‌गुरु श्रीबाबा आपली अतर्क्य लीला दाखवूनही तिचे कर्तृत्व स्वतःकडे घेत नसत. मशिदीतील तो "अल्ला-इलाही राम" तो अद्‌भुत करणीचा कनवाळू फकीर, तो अवधूत दिगंबर दत्त सारे करी. बाबा फक्त त्याच्या आज्ञेत वागत. स्वतःला "अनल हक्" न समजता "यादे हक्" या भूमिकेत बाबा वावरत. त्यामुळे त्या "अल्ला मालिक" फकीराच्या, अवधूताच्या माहात्म्याचे ते मुक्तकंठ गोडवे गात. तो फकीर हाच त्यांचे सरकार होता. या फकीराचे साम्राज्य चराचरावर होते. त्याचेकडील अपरंपार मुक्तिधन गाड्यागाड्यांनी भरलेले होते. हे सरकार म्हणजे प्रत्यक्ष गुरुतत्त्व होते. साक्षात् अवधूत दत्ततत्त्व होते! त्या अद्‌भुत लीलामय अवधूत फकीर सरकाराचे वर्णन करताना बाबा श्री. माधवराव देशपांडे यांना प्रेमाने म्हणत—

माधवा अद्‌भुत हे सरकार !
या फकिराच्या बलसत्तेचा कुणा कळेना पार !

कलिकाळावर राज्य दिगंत
सार्वभौम प्रभु हा सम्राट
तीनहि काळांचा सामंत
आर्त भक्तिचा, अनन्यतेचा यास हवा करभार !

शासन याचे दिशादिशांवर
अठरा भुवनांना आधार
पिंडी-ब्रह्मांडी अभिसार
अदृष्टावर अगोचरावर अनिर्बंध अधिकार

वेदांताहुन गहनगूढतर
तरी करुणेचा अथांग सागर
त्रैलोक्याचा मूलाधार
सूक्ष्म जडातून अवधूताचा मुक्तछंद संचार

ज्ञाताचे हे अविदित कारण
दृश्य सृष्टिचे अदृश्य धारण
चैतन्याचे जड आकारण
निरालंब निर्विकल्पतेचा मायामय परिवार !

निखळ ब्रह्म हे अभेद निर्मळ
नादबिंदु, ज्योतिर्मय केवळ
जन्मा-कर्मांचा वारी मळ
अनंत अद्वय निगमागमसे विलसे निरहंकार

या फकिराची अतर्क्य लीला
अंत न याच्या दिव्यत्वाला
मशिदपायरी जो ही चढला
मोक्षधनाचा धनि हा त्याला करील वेडापार

या फकिराचा रिता न कोष
देव दयेचा हा अविनाश
करुणाजळ वाहते अशेष
अमरत्वाचे मुक्त वर्षितो दान अखंड उदार !

गुणातीत या गुणिता ये ना
अगणित याला कुणी गणे ना
अप्रमेयता कुणि मापी ना
दिव्य निरंजन अलक्ष ज्योति उजळे अंधकार !

दान माझिया सरकाराचे
कल्पांती नच सरावयाचे
भाग्याविण नच लाभायाचे
लुटून घे हे दिव्य हिरण्मय रत्नांचे भांडार

शरणागत या वत्सलचरणी
पंचविषय तू न घे मागुनी
जडवतील ते मरणबंधनी
अवधूताचे अक्षय धन घे मागुनि अपरंपार !

संचित प्राक्तन प्रारब्धाचे
खेळ चालले युगायुगाचे
पुन्हा न क्षण हे परतायाचे
भज सर्वेश्वर, श्रीऔदुम्बर परमसुखाचे सार !

## २०. मी दातार उदार

विश्वाचे पालन करणाऱ्या त्या करुणामय अवधूताच्या वलसत्तेची थोरवी श्रीबाबा गात असत. परंतु ही सर्वसत्ताधारी वैष्णवी शक्ति दुसरी तिसरी कुणीही नसून तमाकडून ज्योतिर्मयाकडे नेणारे साक्षात् गुरुतत्त्व होते. आणि श्रीबाबांच्या विनयशील परोक्षतेतही ते सच्चिदानंद सद्गुरु श्रीसाई बाबांच्या देहातून प्रतीकात्मतेने व्यक्त होत होते. बाबांच्या जिवाभावात, तनुमनात ते विष्णुतत्त्व भरून ओसंडत होते. परमेश्वरी स्वरूपांशी बाबांच्या एकतेचा प्रत्यय त्यांच्या वागणुकीतून व्यक्त होई. त्या अल्लाचे ते बंदे असले तरी अनेक वेळां परमेश्वराच्या तादात्म्य पदवीवरून ते बोलू लागले की त्यांचे परमात्मस्वरूप तेजाने तळपे, प्रकाशमान होई.

एकदा एका चोराने धुळे येथील जिल्हा न्यायालयात आपण चोरलेले जडजवाहिर आपल्याला श्रीसाईबाबानी दिले असे खोटेच सांगितले. शिरडी येथे सरकारने पाठवलेल्या चौकशी कमिशनपुढे द्वारकामाईत बसून साक्ष देताना बाबांनी दिलेली उत्तरे अत्यंत बोलकी व बाबांचे सत्यस्वरूप प्रकट करणारी आहेत—

"बाबा, आपले नाव काय?"
"मला साईबाबा म्हणतात."
"आपल्या वडिलांचे नांव."
"साईबाबा हेच!"
"आपला पंथ?"
"कबीर पंथ."
"जात?"
"परवर दिगार."

"आपले वय?"

"कोट्यवधी वर्षे."

"आपण या चोराला ओळखता?"

"होय, मी सर्वांना ओळखतो. सर्व माझेच आहेत."

"हा आपल्याबरोबर राहिला होता काय?"

"होय, मी सर्वांबरोबर राहातो. मी सर्वत्र वसतो."

"आपण याला जडजवाहिर दिले काय?"

"मी सर्वांना देतो. प्रत्येक वस्तु माझी आहे. माझ्या इच्छेशिवाय कोण, कुणाला आणि काय देईल?"

प्रश्न व्यावहारिक होते. परंतु त्यांची उत्तरे मात्र दिव्य, अद्‌भुत सामर्थ्य-सत्तेची ओळख पटवणारी ठरली. बाबा म्हणाले—

नाथ जगाचा, मी विश्वंभर, मी दातार उदार!
मीच विधाता, मी संहर्ता, ब्रह्मांडा आधार ॥ध्रु० ॥

चैतन्याची वंशवल्लरी
चढली माझी गगनावेरी
ओंकाराच्या कुळीतला मी आद्य प्रणव–हुंकार!

अजर, अमर, मी नित्य सनातन
नसे जन्म मज, नसे विलोपन
महिमा माझा अखंड वाहे काळ–दिशांच्या पार!

धर्म नसे मज मानवतेविण
संत कबीर मी पंथभेदहिन
धर्म जन्मती मत्प्रतिभेतुन, मीच धारणाधार!

नामरूपांना अतीत राहून
अनंत नटतो मी नामांतून
त्रिभुवनचालक चालवितो मी सृष्टीचे व्यापार!

स्वामी मी विश्वाचा वत्सल
दान, देय, मी दाता प्रेमळ
आज्ञेतच मम अखंड वर्ते जडचेतन संसार!

जनक मीच या भूगोलाचा
स्वामि येथल्या कणाकणांचा
वसे चराचर माझ्या ठायी मीही सर्वाकार!

मम संकल्पातुन आकारा
आला सारा विश्वपसारा
उत्पत्ति स्थिति विलयाचा मज अनिर्बंध अधिकार!

पुण्यवंत मम पतितहि माझे
जडी चेतनी मीच विराजे
सर्वभूती प्रतिमा माझी विलसे विश्वाकार!

कालपुरुष मी त्रिकालदर्शी
असून अकर्ता, आहे साक्षी
स्वयं निर्मितो, पालन करितो, स्वयं करी संहार!

## २१. ऐकते तुझी पाउले

कै. सुंदराबाई क्षीरसागर म्हणजे राधाकृष्ण आई यांच्या भक्तीची धारा आगळीच होती. बाह्यतः सेवामय, व्यवहार जाणणारी, तर अंतरात मूक, आर्त आणि नैष्ठिक! चांदोरकर दासगणूंची ती ज्ञानभक्ति नव्हती, माधवरावांची सख्य व आत्मनिवेदन भक्तीही नव्हती. ही प्रेममय मधुराभक्ती होती. राधाकृष्ण आईवर ऐन तारुण्यात वैधव्याची कुऱ्हाड कोसळल्यावर त्या सुंदर गतधवेने आपले तनमन द्वारकाधीशाच्या मूक सेवेला व भक्तीला वाहिले. निष्ठावंत प्रेमाने राधाकृष्ण आई शिरडीतील रस्ते झाडीत. दूर राहून द्वारकामाईची देखभाल करीत. भक्तमंडळीकडून सामुदायिक सेवेची रचनात्मक कार्ये करवून शिरडीला संस्थानाचे स्वरूप आणण्यास त्यांनीच हातभार लावला. बाबांनी द्वारकेची पायरी त्यांना चढू दिली नसली तरी

ती मूक भक्तिधारा उपासनेची व आर्तभावाची पावले टाकीत प्रभूंची जन्माजन्मातून चाहूल घेत त्यांच्या चरणासन्निध वाहू लागली.

ऐकते तुझी पाउले, तुझी पाउले, तुझी पाउले ॥ ध्रु० ॥

जीवाचा करुनी कान
डोळ्यात आणुनी प्राण
मी जन्मजन्म कंठिले....ऐकते तुझी पाउले, तुझी पाउले

त्या अनंत वाटेवरी
चालसी सख्या श्रीहरी
वाजती तुझी पाउले....ऐकते तुझी पाउले, तुझी पाउले

किती युगे येति अन जाती
मी आतुर तुझियासाठी
ध्यासात तुझ्या रंगले....ऐकते तुझी पाउले, तुझी पाउले

तूं येशिल माझ्या घरी
ही आशा धरुनी उरी
मी रात्रंदिन जागले....ऐकते तुझी पाउले, तुझी पाउले

मी तुझीच जन्मांतरी
समजले पुरी अंतरी
ना तुला जरी पाहिले....ऐकते तुझी पाउले, तुझी पाउले

संपेल काल विरहाचा
उगवेल दिवस सोन्याचा
सांगति तुझी पाउले....ऐकते तुझी पाउले, तुझी पाउले

## २२. आरती साईबाबांची

राधाकृष्णआईच्या व्यवहारकुशलतेतून, निष्ठेतून आणि समयज्ञतेतून शिरडीचे व मशिदीचे वैभव वाढले. चावडी, आरती, उत्सव, पूजाविधी

इत्यादि बाह्योपचारांचा बाह्यांग पसारा बाबांच्या कबीरपंथी गुरुपरंपरेला मुळीच रुचणारा नव्हता. परंतु कै. तात्या पाटील, रासने, साठे, दीक्षित, बुटी, माधवराव, दामूशेट, धुमाळ इत्यादी भक्तवरांच्या निग्रही हट्टाग्रहाचा व अविश्रांत परिश्रमाचा परिणाम झाला. भक्ताच्या प्रेमातून शिरडीचे संस्थान बनले. भालदार चोपदार आले, काकड आरती, धूपारती, शेजारती सुरू झाल्या. त्या चैतन्यस्वरूपाची आपणही तेजारती गाऊ या व श्रीबाबांचे आशीर्वाद शिरावर झेलू या.

जय देव जय देव जय बाबासाई ।।
भक्तीच्या बुडवावे प्रेम प्रवाही ।। ध्रु० ।।

मानवत ग्रामात घडली नवलाई
मानवता झाली मानवदेही
त्रैमूर्ती अवतार फकिररूप येई
विश्वाला मुक्तीची द्यावया ग्वाही ।। जय देव जय देव जय बाबा साई०

दक्षिणेची गंगा श्रीगोदामाई
वैष्णव भक्तीचे माहात्म्य गाई
गौतमीच्या तिरी अवतरले साई
दिगंत पसरली लीलांची द्वाही ।। जय देव जय देव जय बाबा साई०

वैराग्याची मूर्ती होते शुकमुनी
साक्षात आदीनाथ अवतरले भुवनी
वर्णिति साक्षात्कार कबिरमुखातुनी
द्वैताचा प्रपंच विलयाला जाई ।। जय देव जय देव जय बाबा साई०

पूर्णब्रह्म राम कृष्णावतार
श्रीपाद श्रीवल्लभ ब्रह्मांडाधार
किंवा श्रीशिवयोगी स्वानंदाकार
शंखचक्रधारी हरि शेषशायी ।। जय देव जय देव जय बाबा साई०

फोडूनी द्वैताचे साम्राज्यकोट
प्रेमाची दाविली मळली वहिवाट
वेधदृष्टी भक्तां रक्षी अद्भुत
नटली आदिशक्ति जणु लीलादेही ।। जय देव जय देव जय बाबा साई०

अष्टभावात्मक दृढ आर्त प्रीती
चरणापाशी स्थिर अनन्य भक्ती
श्रद्धा-सबुरीते वश सहजी होती
शरणागत कोणी ना माघारा जाई ।। जय देव जय देव जय बाबा साई०

वैकुंठ कैलास श्रीसाईचरण
पतितांचे तारण दीनोद्धरण
भक्तचकोरांसाठी अमृतसिंचन
वरदाभय हस्त सदा भक्तशिरी राही ।। जय देव जय देव जय बाबा साई०

## २३. तूं देवता दयेची – तूं प्रेम मूर्तिमंत !

शिरडीचा परिसर श्रीबाबांच्या तेजारतीत बुडून गेला, जयजयकाराने दुमदुमला. याच काळात बाबांकडे दासगणूंसारखे ज्ञानी भक्त आकृष्ट झाले. तमाशा-शाहिरीचा नाद असलेल्या शृंगाररसाच्या शिलेदारास भक्तीचा भाट बनवण्याची किमया बाबानी केली. दासगणूंचे गुरु वामनशास्त्री इस्लामपूरकर यांचेकडून गणूंना बाबांचे माहात्म्य कळले. आपल्या मृत्युसमयी वामन-शास्त्र्यानी गणूंना बाबांच्या हाती निरविले. दासगणू प्रथम साशंक चिकित्सेने बाबांच्या जवळ आले. हळूहळू त्यांच्या पोलिसी खाक्यातील करडा व्यवहारवाद, आपल्या काव्यप्रतिभेसह, शिरडीच्या प्रेमप्रवाहात बुडून गेला, एकरूप झाला. त्यांना बाबांचे दर्शन करुणामय अशा देवतेच्या रूपाने, मूर्तिमंत मायाळ माऊलीच्या स्वरूपात झाले. या माउलीला आत्मनिवेनन करतांना गणू म्हणाले :—

तू देवता दयेची तूं प्रेम मूर्तिमंत
मायाळ माउली तूं कारुण्य देहवंत !
प्राणांतिचा सखा तूं तूं मायबाप बंधू
दे एक अमृताचा या चातकास बिंदू
मी बाळ कोटरीचे मायाळ पक्षिणी तूं
बांधी मला तुझ्याशी हा दिव्य प्रेमतंतू !

माझी तृषा युगांची कल्पांतिही सरेना
दृष्टीतुनी कृपेच्या तूं वर्षि प्रेम पान्हा
मी अंध ज्ञानहीन वंदा तुझ्या पदांचा
स्पर्शाविना मिटेना या दाह अंतरीचा....
मी दीन अन अनाथ आहे जगी अकेला
कारुण्यदृष्टिसाठी आजन्म मी भुकेला !
माझे मला कळेना हित काहि आकळेना
सायास शीण झाला झाली जगात दैना....
वैराण वाळवंटी कुणि सोबती दिसेना
रक्ताळल्या पदांनीं पाऊल आक्रमेना....
आहेस तूं अमीर मी रंकसा भिकारी
आधार त्वत्पदाचा संसार....अंधकारी
आवर्त वादळात तूझा प्रभो निवारा
साई, तुझ्या कुशीचा नौकेस या किनारा !
तूं स्वामि, मी पदाती तूं नाथ, मी अनाथ
आकांति या जिवाला देशिल काय साथ ?
मी जाणितो जगाची मिथ्याच ही रहाटी
आसावलेत प्राण आता तुझ्याच साठी....
झाला निरुद्ध कंठ डोळ्यांत अश्रुधारा
शब्दांत बांधवेना ही आर्त भावधारा....
श्रद्धा विटेसमोर ही भक्ति चंद्रभागा
हृत्पंढरीत माझ्या तूं जाग पांडुरंगा !

## २४. जाणिले मी तुज श्रीरंगा— वाहते चरणांतून गंगा

दासगणूंच्या बुद्धिवादी शंकाकुलतेचे परिवर्तन ज्ञानमय भक्तिधारेत झाले. शृंगाराचा हा शिलेदार भक्तीचा पार्षदगण बनला. दासगणूंच्या रसार्द्र पण बुद्धिवादी अंतरंगात पांडुरंगाची वैष्णवी भक्ति व सांबशिवाची उपासना अशा द्विविध धारा होत्या. हरिहरांच्या एकतेचे अद्वैत त्यांच्या हृदयावर अद्याप पुरते ठसले नव्हते. श्रीबाबांसारख्या साक्षात सर्वेश्वरासमोर द्वैत किती दिवस टिकणार ? एकदा शिवरात्रीच्या समयी गोदावरीच्या तीर्थजलात स्नान करण्याची दासगणूंनी बाबांच्या चरणी परवानगी मागितली. तेव्हा श्रीबाबांच्या विष्णुमय पावलातून पावन गंगेची तीर्थधारा एकाएकी वाहू लागली. श्रीदासगणूंना तात्काळ उमगले की, हाच तो ज्ञानरूप शिव भक्तांच्या प्रेमासाठी वैष्णव भक्तीचे द्वैत खेळतो आहे—

जाणिले मी तुज श्रीरंगा—वाहते चरणातून गंगा ॥ ध्रु० ॥

जान्हवी सांबजटामधुनी
स्फुरे जी मंदाकिनी स्वर्धुनी
तिचे जळ वाहे चरणातुनी—भिजविती तुषार सर्वांगा

तूच तो श्रीनारायण मुनी
तुझी ही गंगा पदवाहिनी
भागीरथी विमल जलामधुनी—तीर्थता वरिते सत्संगा

दिव्य ही शिवरात्रीची घटी
पर्वणी दाटे गोदातटी
बुडावे जळात तटनिकटी—घडावे तीर्थस्नान अंगा

तुझा मी दीन गणूदास
गौतमी—स्नानाचा ध्यास
प्रेमिकापरी खुळी आस—करितसे गंगा भ्रूभंगा

आर्तता स्फुरते प्राणातुनी
जाणसी तूं त्रिकालज्ञानी
बघे मी हरिहर द्वैतपणी—सिद्ध तू हरिसि भेदव्यंगा

प्रभो तूं स्वतःच शिवयोगी
भक्तितुन विभक्तता भोगी
फुलावा वैष्णव धर्मजगी—द्वैतना उधळि भावरंगा

नमन मी करिता पायावर
उसळली गंगाजळ—धार
प्रकटले चरणातुन निर्झर—फुटले पुलकच सर्वांगा

दाटला कंठ नयन ओले
जागुनी अष्टभाव उठले
हरीहर द्वैत सर्व सरले—रुद्रता येइ पांडुरंगा

प्रभो तूं गौरीहर श्रीधर
श्रीपती शंकर गंगाधर
योग तूं भक्तीमय शुभकर—विरक्ति रंगवि रतिरंगा

## २५. संतत तूं प्रेमभरें संतचरित गावें !

(राग—परदीप)

पंढरीच्या परम भागवतांचे वारकरी व शिवभक्त अशा द्विविध निष्ठा असलेल्या दासगणूंना श्रीबाबांनी गंगेच्या रूपाने हरि-हरातले अद्वैत शिकविले. त्यानंतर सरकारी नोकरीच्या सुवर्णशृंखलेतून या महाकवीला मुक्त करून त्याला संतचरित्राच्या आकाशात मुक्त संचार करावयास बाबांनी प्रोत्साहन दिले. पोलीसखात्यातील कळाहीन व रांगड्या यांत्रिक वातावरणात राहून त्या भक्तिविहंगाची प्रतिभा बंदिस्त राहिली असती. "गणू, दुसऱ्याचे जोडे पुसण्यासाठी का आपला जन्म आहे? देवाला तुझी फार काळजी आहे. गणू, तू नोकरी सोड. साऱ्या संतांना

प्रतिभारसाचे भोजन वडव," असा बाबांचा दिव्य आदेश गणूंच्या कानांत घूमू लागला. "चाकरी करावी तर त्या विश्वाच्या महान स्वामींची करावी, दासांच्या दासांची करूं नये. गणू, तूं त्या तेजाची आरती गाण्यास सिद्ध हो. त्या आत्मानंदाची गीते गा!," बाबा प्रेमाग्रहाने सांगू लागले. तो दिव्य नाद दुमदुमू लागला :—

संतत तूं प्रेमभरे संतचरित गावे
परसेवा धनबंधन हरिपदी व्हावे ॥ ध्रु० ॥

दासांचा तू न दास
मालिक करि हृदयि वास
सोन्याच्या पिंजऱ्यात बद्ध तूं न व्हावे

नित हरिच्या धरि छंदा
प्रभुचरणी हो बंदा
पौर्णिमेत भक्तीच्या नित्य तूं नहावे

एकच तो परम धाम
जो अल्ला राम रहिम
त्या हरिविण नच कवणा शरण कधी जावे

तो फकीर करुणामय
त्याविण नच अन्य ठाय
क्षण न विसंबे स्वामी भजति जे स्वभावे

नामसुधारस प्यावा
हरि ध्यावा, हरि गावा
मंथुनिया हा प्रपंच प्रेमामृत प्यावे

प्रभु ज्यांचा प्रेमधाम
गाता गुण श्रमविराम
त्यांचा प्रभु योगक्षेम वाहि प्रेमभावे

ध्यास नको लाखांचा
घास पुरे भाकरिचा
लाखमोल तनमनधन हरिपदी विरावे

संतरूप प्रभु-प्रतिमा
गा त्यांचा नित महिमा
तेजाच्या आरतीस सूर उंचवावे

वाहु देत ओसंडुन
अमृतरस रसनेतुन
समरसुनी अष्टभाव तूं रोमांचावे

## २६. पंडिता अगम्य जो अर्थ— उकलिते दासी वेदान्त !

सरकारी नोकरीचे बंधन तोडताना दासगणूंना फार अवघड वाटले. परंतु प्रचंड संकटपरंपरा, नोकरीतील व्यापताप यांच्यातून बाबांनी त्यांना वेळोवेळी कृपेचा हात देऊन शेवटी या मोहातून संपूर्णतया मोकळे केले. त्यानंतर गणूंनी संतचरित्रे व भक्तिपर रचना यांनी संतवाङ्‌मयाला मोलाचे लेणे चढविले. भक्ति व ज्ञान यांना गीतांतून पाट फोडले. एकदा ईशावास्य उपनिषदावर भाष्य करण्याची गणूंना इच्छा झाली. पहिल्याच चरणातील हे जग ईशावास्य (ईश्वराने व्यापलेलें) आहे. त्याचा त्यागयुक्त भोग घे (तेन त्यक्तेन भुंजीथाः) या ओळीवरच गणूंची मति कुंठित झाली. गणूंची अडचण ओळखून बाबा आपल्या लोकविलक्षण पद्धतीनुसार म्हणाले, "गणू, तू पार्ल्याला दीक्षितांच्याकडे जा. काकांची मोलकरीण हा वेदान्त तुला उकलून दाखवील."

पंडिता अगम्य जो अर्थ—उकलिते दासी वेदान्त ॥ ध्रु० ॥
प्रभूंचा अद्‌भुत संकेत—वाहतो शब्दाविण संथ

चराचर हे "ईशावास्य"
दासगणू गुंफितात भाष्य
व्यापिले विश्व नखशिखांत—कणोकणि भरला भगवंत

"तृप्तता भोगा त्यागातुनी"
आर्ष ही उपनिषद् वाणी
त्यागमय भोगाचे पंथ — जोडिती ज्ञानाचे प्रांत

गणूंची झाली कुंठित मती
अकुंठित चरण पुढे दिसती
कळेना भोग त्याग द्वैत — वंदिती प्रभुपद अद्वैत

"गणू जा काकांची दासी
प्रकटविल उपनिषदार्थासी"
जाणिली मनातली खंत — बोलले ज्ञान मूर्तिमंत !

उगवला दीपावलिचा दिन
घरोघरि आनंदाचे धन
दीक्षितांघरी देहलीत — श्रवणि ये आर्त एक गीत

नेसली जुनेर कुणि पोर
वर्णिते शालू जरतार
व्यथा जणू तिच्या अंतरात — वावरे हौस लक्तरात

तृप्त का होईल ही प्यास ?
पुरवि कुणि मनातला ध्यास ?
ऐकती गणू सूर आर्त — कळवळा दाटे हृदयात

दिली लिज जरतारी साडी
पुरविली जीवीची आवडी
सौख्य मग उजळे नेत्रात —— जाहली पोर तृप्त शांत !

नेसुनी जुने पुन्हा आली
पोर ती तनुमनी धाली
गान परि फिरून तेच गीत —— जाहली भोगाविण तृप्त

उलगडे त्यागातील तृप्ती
अर्थ ये शब्दाविण हाती !
भोगणे भोग वियोगात —— त्यागमय भोगाची मात

प्रभूने व्याप्त जगत पूर्ण
तयाविण काहि नसे शून्य
जिवातुन स्वामी श्रीमंत — भोगतो प्रभुत्व सामंत

विराजे भोगशून्य तृप्त
विलासी सर्व-संगमुक्त!
ईश हा स्वामी सम्राट — नांदतो प्राणाप्राणात

## २७. न्या दयासागरा, जन्ममृत्युच्या पार....

परमेश्वराची कृपा असल्यास मूकही पंडित बनतो, पंगू हिमालय ओलांडतो आणि काकासाहेब दीक्षितांची मोलकरीण दासगणूंसारख्या प्रतिभावंताला ईशावास्य उपनिषदाचे रहस्य समजावून देते. दासगणूंच्या प्रतिभेने संतांची चरित्रे गुंफली. श्रीबाबांच्या महात्म्याचे व कार्याचे गुणगान काव्य व कीर्तनाद्वारे दासगणूने महाराष्ट्रभर गायिले. बाबांच्या कीर्तीचा सौरभ दूरदेशी पसरू लागला. दासगणू, नानासाहेब चांदोरकर, साठे, दीक्षित, माधवराव देशपांडे यांसारखी भक्त, ज्ञानी, जिज्ञासू व साधक मंडळी हळूहळू जीवनाच्या रहस्याबद्दल बाबांना शंका विचारू लागली. प्रणाम, विनयशील प्रश्न, सेवा यांद्वारे सद्गुरूकडून शिष्यवर्ग ज्ञानप्राप्ति करून घेतो. एकदा चांदोरकरांनी जिज्ञासूंच्या मेळाव्यातून बाबांना विनवणी केली, "बाबा हा सुखदुःखात्मक संसार पुरे झाला. हे दयासागरा! या जीवनाची नौका जन्ममृत्यूच्या पार न्या, हा संसार अखेरचा ठरू द्या."

श्री. चांदोरकर : ...."न्या दयासागरा, जन्ममृत्युच्या पार....
हा प्रभो ठरावा अखेरचा संसार! ॥ ध्रु० ॥

ही नाती गोती भ्रमति धनाच्या भवतीं
आपुलेपणाचे उगाच जाळे विणती
कुणि नसे सोबती अंती वा आकांती...
मायाच घेतसे छायामय आकार

वासना उसळली धरून रूप आशांचे
वर विजयगीत, पण तळी निराशा नाचे
जन्मातून उघडे महाद्वार मरणाचे....
शिरपेच कधी, कधि राखेचा उपहार !

क्षण रजतरुपेरी स्रवे चंद्ररसधार
नाचतो रुद्र कधि करित विश्वसंहार
कधि पुष्पशेज, कधि धगधगतो अंगार ।
विरते न हास्य, तो झरे अश्रुंचा पूर..."

श्रीबाबा :... "ही श्रद्धा आणिक शरणागति मज प्यार
आर्तास्तव बरसे मम करुणेची धार...
परि दुस्तर आहे कर्मनदीचा पार
का गृह-धन-दारा एवढाच संसार ?

मन चंचल धावे पिसाट विषयांपाठी
करि रंग-रूप-रस-स्पर्शास्तव आटाटी
बंधात गुंततो जीव वासनेपोटी
संसार सकल हा पंचेंद्रिय-व्यापार

प्रारब्ध उठविते मनांत वृत्ति अनंत
मग अहंकार दे नव्या संचिता साथ
निःस्तब्ध रहावे तरंगात या शांत
लक्षावे अविचल सुखदुःखांच्या पार....

कौतुके पहावा हा लीलामय खेळ
भोगात विरक्ती, त्यागि तृप्तिचा मेळ
द्वंद्वात बुद्धिचा ढळावा न समतोल
प्रेमात प्रभूचा असारहि हो सार

फळ नसे प्रयत्ना प्रारब्धाविण काही
नशिबात असे हे भोग भोगणे देही
ये कर्म नव्याने आसक्तीच्या गेही
भोगणे फळाविण कर्माचा अधिकार

धन हवे निरंतर परी नसो कार्पण्य
शासावे दुष्टां खळां दिसो काठिण्य
द्या घांस भुकेल्या आर्तास्तव कारुण्य
नित लोभ-मदाविण सहज घडो आचार

द्या सामर्थ्याला विनयाचा आधार
सत्तेस सुज्ञपण ध्येयाला व्यवहार
स्वार्थासहि व्हावे परसेवा-संस्कार
आचारच व्हावा एक उदात्त विचार !

या विश्वनाटकी रंगावे अंगांग
परि अंतर्यामी नसो कुणाचा संग
अंतरी फुलावे आर्त भक्तिचे रंग
मुखवटा मुखावर, हृदयी अमृतधार !

हा विवेक होतो साधन मोक्षपदाचे
मग जिणेच होते पंथराज मुक्तीचे
घरदारहि बनते दिव्य रूप देवाचे
संसार न उरतो उरतो मोक्षाकार ”

## २८. श्रद्धेसवे तितिक्षा—मज प्यार दोन दाम

श्रीसाईबाबांनी माधवराव देशपांडे यांना भक्तीचे रहस्य व नानासाहेब चांदोरकरांना ज्ञानभक्तीतील साक्षीभावाचे मर्म पूर्वीच विशद केले होते. परंतु व्यवहारात कर्तव्यकर्मे वजावताना प्रत्येक कृती एक साधनाच बनली पाहिजे, सारा संसार मोक्षाकार बनला पाहिजे, हे कर्मयोगाचे यज्ञरूप तत्त्वज्ञान सर्वांना पुन्हा एकदा सांगितले. थोडक्यात सांगायचे म्हणजे हृदयात भक्ती, बुद्धीमध्ये साक्षीभाव, कर्मात यज्ञमयता आणि अहंकारामध्ये परमेश्वरी अस्मिता बिंबवण्याचे तत्त्व सूत्रमयतेने बाबांनी प्रतिपादिले. याशिवाय जीवनातील त्यागाचे आणि सहिष्णुतेचे माहात्म्य ते विचित्र

रीतीने पटवीत. ते भक्ताकडे दोन रुपये मागत. ही दक्षिणा म्हणजे श्रद्धा व सबुरी या दोन अमूल्य गुणांची मागणी असे. श्रद्धा आणि सबुरी, प्रेम आणि तितिक्षा—श्रीबाबा जणूं म्हणतः—

आनंदरूप माझे मी तृप्त पूर्णकाम
परि भक्तिला भुकेला वर्ते सदा प्रकाम । ध्रु० ।

संन्यस्त मी फकीर निःसंग प्रेमधाम
कुंजात भावनेच्या खेळे मुकुन्द श्याम

साम्राज्य हेच माझे श्रद्धेत सार्वभौम
मी प्रेमचक्रवर्ती सामंत दिव्य धाम

भक्ती, उदंड प्रीती संसारि या ललाम
प्रेमार्त अंतरात घे जन्म नित्य राम

मी देह द्वारकेत व्यापून रोमरोम
हृत्कंपनी विराजे चैतन्यरूप श्याम

त्यागून आर्त भाव लाभेल काय प्रेम ?
श्रद्धेत ते शरण्य रामात तो विराम !

त्यागाविना न योग रूपाविना न नाम
मायानदी पल्याड स्वानंद लोक धाम

फल, पुष्प, पत्र, तोय मी वांछितो न हेम
द्या प्रेम-भक्तिरूप मज दोन दिव्य दाम

निष्ठेसवे सबूरी प्रेमासवे प्रणाम
श्रद्धेसवे तितिक्षा मज प्यार दोन दाम

आनंदरूप माझे मी तृप्त पूर्णकाम
परि भक्तीला भुकेला वर्ते सदा प्रकाम

## २९. घ्या आनंद-घना रे !....

“संसारातील वांछिते असोत की साधनेतील ईप्सिते असोत, प्रत्येकाने उत्कट श्रद्धा व अखंड सबुरी या दोन अमूल्य तत्त्वांचे मोल वेचल्यावाचून अभीष्टांची प्राप्ति कदापिही होणे शक्य नसते. परंतु सर्व कर्मे करीत असताना, जीवनकलहाच्या तीव्र समर प्रसंगातूनही मार्ग काढताना प्रभूच्या प्रेमाचा दोर बळकटपणे हाती धरावयास हवा. त्या जन्ममरणहरणाला, लीलामय रमणाला प्रेमबंधनाच्या मृणाल रज्जूंनी बांधून कायमचे बंदिस्त करून ठेवायला हवे. परंतु त्या आनंदघन प्रभूला प्रसन्न करण्यासाठी प्रेमाच्या आर्ततेबरोबरच सकल वृत्तविकारांचे समर्पण हवे असते. मान-अभिमान, धनदारा यांच्या ईषणेचा त्याग हवा असतो. वैर, ऋण व हत्या यांपासून कटाक्षाने दूर राहावयास हवे असते. मगच तो आनंदकंद प्रसन्न होतो.”–अशा गोड शब्दांत बाबा संसारातील त्याग प्रेममय कर्माचरणाचे व त्यात अनुस्यूत असलेल्या आनंदमय भक्तिधारेचे रहस्य सांगत—

नको द्रव्यधन, विषमय बंधन, घ्या आनंद धना रे
स्वानंदाच्या कंदा वंदा, हरि कारुण्यघना रे

परमसौख्य छंदास मुकुंदा, मोक्षाच्या सदना रे
निरभिलाष घ्या दिव्य प्रेम, नच धनदारा ईषणा रे

नको कांचनी, बंध निशिदिनी, मत्सरलोभ उणा रे
विटो तनूमन, विषय विमोहन, ब्रह्मानंद गुणा रे

त्यजा मान, अभिमान अकारण हत्या वैर ऋणा रे
घ्या शरणागति, श्रद्धा भक्ति, देह प्रावरणा रे

विरक्तीच ही, प्रभु–अनुरक्ति. सकल हरी दुषणा रे
जन्ममरण जो हरिल त्या भजा, श्रीहरिच्या चरणा रे

स्मरा श्रीहरी, श्याम मुरारी, मधुकैटभहनना रे
चिरभवतरणा, श्रीहरिचरणा, धरि अशरण शरणा रे

तुरियेच्या तटि, यमुने निकटी, लीलामय नटना रे
मनी कुंजवनी, घुमे वेणुध्वनि, नादब्रह्म भरणा रे

सप्तलोकि जो एकवीर, त्या भवसागरतरणा रे
प्रेमबंधनी त्याला वांधा, जन्ममरणहरणा रे

## ३०. अध्यात्म पदवीचे यात्रिक आम्ही चार

श्रीबाबांनी संसारी भक्तांना, आनंदाचा महान् ठेवा कसा हस्तगत करावा, याचे रहस्य सांगितले. आपली सांसारिक कर्तव्यकर्मे आचरिताना प्रभुप्रेमाने आणि भक्तीने मन, बुद्धि आणि अंतःकरण कसे भारून टाकावे याचे मर्म बाबानी प्रकट केले. या मार्गाने मनुष्य आध्यात्मिक दृष्टीने उन्नत होऊन क्रममुक्तीचा अधिकारी होतो. या संसारी साधकांत काही प्रगत आणि तीव्र साधक होते. त्यांना सद्योमुक्तीचा ध्यास होता. ज्ञान, भक्ति, कर्म, योग या चारही पंथांचा परिचय होता. मुक्तीसाठी त्यांची अखंड धडपड होती. अशा साधकांच्या मार्गदर्शनाखाली बाबांनी आपल्या साधनाची एक रूपककथा सांगितली. वेद, वेदान्त, शास्त्रे, पुराणे यांच्या अभ्यासाने भगवंताची भेट घडू शकली नाही. यामुळे एकदा श्रीबाबा व त्यांचे तीन सहप्रवासी साधक तीव्र आवेगाने साधनामार्ग आक्रमू लागले. त्यांपैकी एक जण गुरु व ग्रंथप्रामाण्य न मानणारा प्रयत्नवादी योगी, दुसरा कर्मवादी, तिसरा ज्ञानमार्गी होता. श्रीबाबा मात्र गुरूवर श्रद्धा बाळगणारे श्रद्धा व शरणागति–वादी विनम्र भक्त होते. गुरुकृपेतून त्यांना सच्चिदानंदपदाचा लाभ झाला त्या दिव्य घटनेची ही कथा ऐका—

अध्यात्म पदवीचे यात्रिक आम्ही चार
शोधिले मुक्तिचे मार्ग पंथ चत्वार ॥ ध्रु० ॥

जाणाया सृष्टीपलिकडला भगवंत
श्रुतिस्मृतिपुराणे शास्त्रे अन् वेदांत
मंथिली, मांडिला शब्दांचा आकांत
ग्रंथांत धुंडिले निर्वाणाचे द्वार

मग वदे एक हा आहे दुर्गम पंथ
कणभरही नेदी गुरू आणखी ग्रंथ
या संथ साधना हवी मात्र एकांत
आपुल्या प्रयत्ना आपुलाच आधार

मन केवळ आहे द्वार बंधसरणाचे
तर्कातच आहे मूळ कर्मबंधांचे
स्थिर व्हावे जेथे तरंग संकल्पाचे
तो योग एकला आहे मोक्षद्वार !

मग दुजा वदे की कथिले श्रीगीतेने
आपुले उद्धरण कर्मे अपुल्या होणे
मग फोलच गमती ग्रंथांतरिची वचने
शब्दांत गुंफिला शब्दांचा विस्तार

मग गर्जे तिसरा नको योग वा कर्म
ज्ञानातून वाहे अक्षय शाश्वत धर्म
रे विवेक जाणे संसाराचे मर्म
ज्ञानाविण नाही अन्य जगी बडिवार

मज ठाऊक नव्हते कर्म, योग वा ज्ञान
परि अंगि न होता देहबुद्धि अभिमान
उरि उसळता होता श्रद्धाभाव महान
प्राणातून होता उचंबळत निर्धार

तुडविले पंथ, लंघिले शैल पाषाण
भन्नाट हिंडलो उन्हावादळातून
नजरेत न आले मोक्षशिखर "निर्वाण"
चित्तात उसळले शंकांचे काहूर

मी विनम्र झालो विकल आर्त, शरणार्थी
गुरुदेव प्रकटले एकाएकी पुढती
पुरविली माझिया तृषार्त मनिची आर्ती
तेजात बुडविला हृदयातील अंधार

अर्पिला गुरूच्या चरणी माझा देह
मन, बुद्धि आणिक अहंकार संदेह
बांधिली मनाची मोट, शमविला दाह
सच्चिदानंद मी उरलो विश्वाकार

## ३१. सुजन हो, सहजसमाधि खरी !

गुरुकृपेच्या अमृतमय स्पर्शाने आपण ज्ञान कर्म आणि योग यांच्या पलिकडे कसे पोहोचलो व सच्चिदानंदस्वरूप झालो त्याची कथा बाबांनी सांगितली. सद्गुरु व्यंकुशहां (व्यंकटेशां)च्या नाथपंथी स्पर्शदीक्षेद्वारे बाबा परमानंदाचे अधिकारी बनले. सद्गुरूंनी शक्तिपाताद्वारे त्यांना सहजसमाधीचा तात्काळ अनुभव दिला. हीच सहजावस्था पूर्वावतारीच्या कबीराला श्रीरामानंदांनी दिली. नव्या अवतारी कबीरनाथ श्रीसाईनाथ बनले. या सहजसमाधीच्या अखंड योगावस्थेचे श्रीकबीरांनी फार बहारदार वर्णन केले आहे. या गूढ रम्य अमृतानुभवाची मांडणी या गीतात केली आहे—"साधो, सहजसमाधी भली! गुरुप्रसादाने ज्या क्षणापासून ती जागृत झाली आहे, त्या क्षणापासून सारखी विकास पावते आहे."

सुजन हो सहजसमाधि खरी ! ॥ ध्रु० ॥
गुरुकृपेने जागृत झाली, अनुदिन सौख्य भरी
उघडे डोळे, श्रवण मोकळे, सन्मुख श्याम हरी
नावरले तनुमना तरीही बरसत अमृत-झरी
परमानंदी उन्मन हो मन प्रकाश पंथा धरी
यमनियमाविण योग समजला सायुज्यांच्या घरीं
तडिल्लता चमकते, गुंजते ऋतंभरा वैखरी
ज्ञाननयन उघडला, उतरलो समतेच्या परतिरीं
चैतन्ये रसरसे अस्मिता, द्वैत सकल आवरी
अनाहताच्या रथांत बसलो, आलो हरद्वारीं

सुखदु:खाच्या पार पहुडलो "सोऽहं" पीठावरी
चिदाकाश शून्यांत झंकरे प्रवण एकतारी
असल्या छंदी परमानंदी ये स्वानंद करी
अलख पुरुष पलखांत खेळतो चिद्गगनाभ्यंतरीं
प्राणभृंग तो हंस भिरभिरे सहाहि चक्रांवरी
अशी समाधी क्षणहि मिटेना, देह तुटावा तरी!

ग्रंथ संग्रहालय
९८५८

## ३२. समाधीत बसला का मौनी ?

ज्ञानावस्थेतून गुरुकृपेद्वारे दिशाकालातीत अस्तित्वाचा दिव्यानुभव देणारी सहजसमाधि ही श्रीबाबांची अखंड योगावस्था होती. कबीरपंथाचा तो अद्भुत वारसा होता. त्याचे मर्मरहस्य ज्ञानीच जाणतात! तथापि श्रीबाबा आपल्या ज्ञानावस्थेतही गुरुप्रेमाने भारलेले होते. सद्गुरु व्यंकुशहांचे पार्थिव पद अंतरल्यावर त्या निर्वाणक्षणीं (या पूर्वजन्मीच्या कवि कबीराने, या चारी युगांतून गुरुकृपेची दिव्य धून गाणाऱ्या प्रेम विहंगाने) आपल्या गुरुरायाला आर्त स्वरानें आळविले होते :— "प्रभो, समाधीत गप्प का बसला? मला ओळखले नाही काय? आज आपण का रुसलात?"

आपुला मंगल महिमा मी गातसे चार युगांमधुनी ॥ ध्रु० ॥
अर्पिली चरणांवर वाणी गुंफिल्या लीला शब्दांनी!
पडे का विसर तुम्हा स्वामी? का न मज ओळखिले अजुनी?
तरारे नयनातुन पाणी प्रभो, नच विन्मुख व्हा वचनी!
तळपता उन्हावादळात शिरी ये करुणेचा हात
झुंजता जीवित्वाच्या रणी बांधता जखम हातांनी!
वेढिता दुष्टांनी भवती कुंठिता रथचक्राची गती
सुदर्शन चक्र करी धरुनी चतुर्भूज सन्मुख संरक्षणी!
तमाची ओसरते रात्र मोकळी वाट इहपरत्र
वर्णवे प्रीत न शब्दांनी न्हाणितो पाय आसवांनी

प्रीत ये अविरत ओसंडुनी वाहते शब्दाशब्दातुनी !
तुम्हातच तनमनधन रंगुनी रेखितो कविता अश्रूंनी
झळकती ज्योती नयनातुनी नादतो आघाताविण ध्वनी
परम तुम्ही अलख पुरुष त्रिभुवनी हंस तुम्ही दिव्य नील गगनी !
आतल्या चिन्मय गगनातुनी लवलवे तडिता पलकातुनी
दिव्य त्या अनुहत नादातुनी झळकता सुवर्णसिंहासनी !
आज नच शब्द येत कानी दिसेना रूपहि नयनांनी
पाय का गेले अंतरुनी ? अकल्पित का गेला निघुनी ?
आज हे विपरित का झाले ? प्राण का देहासी रुसले ?
कौमुदी शीतलना त्यजुनी वसे का किरणांशी रुसुनी ?
चातका त्यजी मेघमाला ? प्रभो, का रोष तुम्हा आला ?
गुंजता अस्तित्वामधुनी समाधित बसला का मौनी ?
धरुनि हा वत्सलतेने कर कोण मज रक्षिल वाटेवर ?
नेत्र हे भिजता अश्रूंनी पुसावे अपुल्याविण कोणी ?

## ३३. श्यामसुंदरा! इंदिरावरा! श्रीजगदाधारा!

श्रीबाबांनी आपल्या गुरूंच्या निर्वाणकाळी असाच हंबरडा फोडला. गुरूवरची प्रीति अशीच सूक्ष्म स्थूलाला व्यापून दशांगुळे उरलेली असते. गुरुशिष्यसंबंधाला जगात तोडच नाही ! एका धनुसंक्रांतीला सारा भक्तमेळा बाबांच्या प्रेमळ सहवासासाठी एकत्र आलेला होता. पहाटेची वेळ. श्यामसुंदर श्रीसाई अद्यापहि योगनिद्रेतच होते. "श्रीधरा, माधवा, श्रीकांता, तुम्हीच निद्रिस्त होऊन राहिलात तर विश्वाला जागृत कोण करणार ? संसारातील कर्मांची वाटचाल करताना मनीची आर्तता क्षणाक्षणाला हरवते आहे, बुद्धीची समसाम्यता मलीन होते आहे. अहंकाराची भिंत दिव्याच्या नाद-प्रकाश लहरींना आत प्रवेश करू देत नाही. हे ज्ञानमया, तेजोमया, आनंदमया, उठा ! आमची ही प्रेमारती ऐकून खडबडून जागे व्हा आणि तुमची गीतमय गीता, ज्ञानाची दिव्यामृतधारा अखंड बरसत ठेवा !" भक्तांनी आळविलेल्या भूपाळीचे सूर

या पहाटेच्या शिरडीच्या वातावरणांत प्रेमाच्या व भक्तीच्या सुगंधित भावलहरीमधून वाहू लागले.

श्यामसुंदरा, इंदिरावरा, श्रीजगदाधारा !
प्रभातकाळी, ही भूपाळी, माझी अवधारा ॥ध्रु० ॥
श्रीकांता, श्रीपती, श्रीवरा ! नीज दूर सारा
केशरकांचन शिंपित उठली सुवर्णमय द्वारा
अपुल्यावाचुनी न्यावी कोणी नाव पैलतीरा ?
तुम्हीच निजता जागवील कुणि निजल्या संसारा ?
अज्ञानाची रात्र दाटली अंत न अंधारा
श्रीगीतेतुन पुन्हा झरू दे दिव्यामृतधारा
उठा माधवा ! उठा श्रीधरा ! माया–तम वारा
चिद्गगनी लखलखे एकली मात्र दिव्य तारा
उठा मुकुंदा ! श्रीगोविंदा ! आनंदाकारा
शब्द ऐकण्या एक आपुला वितत जन्म सारा
कर्मपंथ तुडविता हरपली आर्त भावधारा
ही प्रेमारति, ही शरणागति, माझी स्वीकारा
श्रीरंगा, श्रीकरा, उदारा, प्रेमळ दातारा
हात दयेचा द्या रमावरा ! उद्धारा, तारा
उठा उठा ! स्वानंदप्रेममय प्रभु विश्वाकारा
या गीतातुन नवीन गीता यावी आकारा !

## ३४. प्रभु, ज्योतीमधुनी ज्योत जळो !

त्या भूपाळीच्या स्वरांनी श्रीसाईनारायण जणूं शेषाच्या शय्येवरून हळूहळू जागे झाले. श्रीमुखावर "सवितृ–मंडळ मध्यवर्ती" पद्मासनस्थ श्रीविष्णूची दिव्यामृतधारा प्राशावयास भक्तमंडळ आतुर, उत्कंठित झाले होते. त्या जगद्गुरु नारायणांच्या नयनांतील ज्योती पाजळू लागल्या.

त्या नयनांतल्या ज्योतींमधून आपल्या आत्म्याची ज्योत प्रकाशित करून घ्यावयाची मनीषा प्रत्येकाच्या हृदयात स्फुरत होती. तो दिव्य प्रकाश कधी स्फुरेल ? तो वेणूच्या स्वरातून वाहणारा अद्भुत व लाघवी "अनुहताचा हल्लरू" श्रवणी पडावा म्हणून सर्वांनी जीवाचा कान केला होता. संसाराच्या कदंब वृक्षाखाली मोहाचा व आसक्तीचा कालिया विषहीन बनावा, जन्मच स्वरमय व्हावा, कर्मांची कालिंदी नदी अमृताने भरून वाहावी यासाठी प्रत्येक भक्त धनंजयाच्या श्रद्धेने त्या पार्थसारथी प्रभूकडे आर्त दृष्टीने पाहात होता व मनाशी गुणगुणत होता—

नयनात आपुल्या नयन मिळो । प्रभु, ज्योतिमधुनी ज्योत जळो ॥ध्रु०॥

रूप सावळे ललित मनोहर
मोरपिसांचा मुकुट शिरावर
वेणु गुंजते अधरी सुंदर
त्या अमृत-सुरावर जीव डुलो । प्रभु, ज्योतीमधुनी ज्योत जळो !

अनुहताचा हात धरावा
जन्मच अवघा स्वरात न्हावा
मरणाचाही बंध मिटावा
शिरि सहस्रदळ अरविंद खुलो । प्रभु, ज्योतीमधुनी ज्योत जळो !

तन्मय मन हे व्हावे उन्मन
प्रेम झरू दे स्वरमालेतुन
निथळु दे आनंद घनातून
घनश्याम सुखाचा इथे वळो । प्रभु, ज्योतीमधुनी ज्योत जळो !

संसाराच्या कदंबतरुतळी
मोह-कालिया मोहन कवळी
अमृत भरू दे कालिंदीजळी
प्रभु, सौख्य सुखाच्या उरी सलो । प्रभु, ज्योतीमधुनी ज्योत जळो !

अवघे जीवन प्रीत बनावे
आनंदाला छंद फुटावे
गीत नवे पण अधरिं उरावे
काव्यास दिव्य हा स्पर्श कळो । प्रभु, ज्योतीमधुनी ज्योत जळो !

पार्थसारथी तुम्ही करुणामय
कृष्णसखा मी धन्य धनंजय
श्रीगीता ही बनो गीतमय
या भक्ति-फुलातून मुक्ति फुलो । प्रभु, ज्योतीमधुनी ज्योत जळो!

## ३५. जो श्रीबाबांचे पद जाणे त्या संसारामधि काय उणे ?

शिरडी येथे त्या प्रेमळ भक्तवृन्दाने श्रीबाबांच्या रूपाने विलसणाऱ्या त्या दिव्य गुरुतत्त्वाला आवाहन करताना म्हटले, "हे पार्थसारथी जगद्‌गुरो ! तुम्ही या संसाराच्या कदंबवृक्षाखालून वाहणाऱ्या प्रेमकालिंदीच्या जळात अमृत भरा. या जळभाराखाली दडलेल्या मोहरूप कालियाला, हे मोहना ! आपण विषहीन बनवा. हे श्यामसुन्दरा ! आपण तो अनाहताचा हल्लरू गा, मनपवनाची खेळणी करून योगसुखाचे सोहाळे, सोऽहंसिद्धीचे लळे आम्हाला अनुभवावयास द्या. प्रत्यग् ज्योतीची ओवाळणी करा. सत्तरावीचं स्तन्य पाजा. गुरुप्रेमाच्या अद्वैत भावातच सकलसिद्धी विराजमान आहेत. बाबा ! आपल्या श्रीपादपद्मांना ज्यांनी आणले, त्यांना संसारात आणि परमार्थात काहीही उणे राहावयाचे नाही. आपल्या गुरुप्रीतीची गाणी जो गाईल, त्याला आपण भवाच्या पार न्याल ! तो आत्मानंदात सहज विलीन होईल. तो देही असून विदेही बनेल. तो भोगी असून अनासक्त बनेल. त्याचे कर्म निष्कर्म बनेल. त्याचे जीवन कृतार्थ, रसमय, आणि प्रातःस्मरणीय ठरेल ! असे गुरुप्रेम आमच्या अंतरात बाणू द्या व आम्हाला आपल्या कृपेचा, उपदेशाचा अमृतरस प्राशावयास मिळू द्या. आपल्या गुरुकृपेचे अमोल शब्द आज आमच्या श्रवणसंपुटी पडू द्यात. आपला मंत्र, आदेश, उपदेश आज आम्हाला लाभू द्या-"

जो श्रीबाबांचे पद जाणे त्या संसारामधि काय उणे ?॥ध्रु०॥
त्रैलोक्य तयाच्या धन्य गुणे भव कृतार्थ त्याच्या गुणगाने

जो गुरुकृपेचे गा गाणे
तो परमानंदी नित न्हाणे
हा असार जरि संसार बने
रससार भरे गुरुप्रेमगुणे
जो गुरुचरणावर वाहि जिणे
तो अमरपदी विलसे ज्ञाने
श्रीगुरुपद संतत जो वाने
सौभाग्य तयाचे नसे उणे
तो कर्म करी निष्कर्मपणे
तो भोग वरी निस्संग मने
तो योगि तरी अभियुक्तपणे
प्रतिवचनीं उधळी ज्ञानधने
तो सन्मुख तरीही मूकपणे
भरी विन्मुखतेतहि स्नेहधने
जग नामरूपांकित ज्या नेणे
परी नामरूपातून तो न्हाणे
जडी व्यक्त दिसे चैतन्यगुणे
लीलातून उधळी सिद्धिधने
तो सगुणपणाच्या वरदाने
दे निर्गुणतेला नव लेणे
जरी निरर्थ अवघा अर्थ गणे
धन परमार्थाचे परी जाणे
तो हंसपुरुप गुरुभक्तिधने
करिमंगलमय अवघेच जिणे
जो श्रीबाबांचे पद जाणे
त्या संसारामधि काय उणे ?

## मूर्तिमंत मी मोक्ष समोरी, मीच मंत्र–आदेश

## ३६. अंतरी ठसो हाच उपदेश !

श्रीबाबांच्या श्रीपादपदातून स्फुरणारी दिव्य गुरुगीता ऐकावयास भक्तांची मने उत्कंठित झाली होती. श्रीबाबांच्या मुखावर दिव्य स्मिताची एक रेषा उमटली. खऱ्या वेदांताचे सार आज शब्दांत प्रकटावयास उत्सुक बनले होते. ती तेजोमय अक्षरलिपी शब्दाकार घेऊ लागली. श्रीबाबा आपल्या अजर, अमर आणि चैतन्यमय रसवंतीमधून धीरगंभीर बोलू लागले.

"श्रद्धा आणि शरणागती या दोन अमोल तत्त्वांची गुरुदक्षिणा मी माझे सद्गुरु श्रीव्यंकुशहा यांच्या चरणी अर्पण केल्यावर त्यांनी आपल्या दृष्टिवेधाद्वारें माझ्या अस्तित्वात आरपार प्रवेश केला व मला सच्चिदानंदात निमग्न केले. माझ्या गुरूंनी मला दुसरा कोणताही कानमंत्र दिला नाही, की साधना शिकविली नाही. म्हणूनच तुम्ही कोणताही मंत्र,

जप, ध्यान, ज्ञान, भक्ति, योग आचरू नका. तुम्ही फक्त माझ्याकडे पाहा व स्वस्थ राहा. तुम्ही माझे व मी तुमचा हाच माझा मंत्रोपदेश आहे. एकदा तुम्ही तुमचा भार माझ्या शिरावर सोपविलात, की तुमच्या जीवननौकेला पैलपार मी निश्चयाने नेईन. माझ्या नाथ आणि कबीरपंथी गुरुदीक्षेतील शक्तिपाताचे हे अत्यंत लोकविलक्षण वेधसामर्थ्य आहे.

मूर्तिमंत मी मोक्ष समोरी, मीच मंत्र आदेश
अंतरी ठसो हाच उपदेश ॥ ध्रु० ॥

तीर्थे सारी माझ्या चरणीं
शास्त्रे भरली माझ्या वचनीं
सकल साधने रत मद्‌भजनीं
"तुझा मीच अन् माझा तू" हा भर हृदयी संदेश !

ऋणानुबंधाचे हे नाते
तुला माझिया जवळ ओढिते
प्रेमसूत्र हे जन्म गुंफिते
या प्रेमास्तव मी फकिराचा धरिला करुणावेष !

कासविची ही दृष्टी प्रेमळ
दुरून पिलांचा करि सांभाळ
दिव्य वेध अद्‌भुत स्नेहाळ
काळ-दिशांतुन पाहति वत्सल लोचन मम अनिमेष....

मम दृष्टीने तुटता बंधन
खुले, मोकळे हो भवबंधन
जड भिंतीचे विरे निरोधन
आणि कृपेची अमृतधारा भिजवी आंतरदेश....

नको मिमांसा, नको पुराणे
नको भक्तिचे अंध तराणे
नकोच जपतप नको साधने
मम चरणाचे शरण्य पुरविल अंतरिचे उद्देश !

नेत्र जडव तूं माझ्या चरणी
चित्त बुडव तूं माझ्या स्मरणी
विरवी प्रज्ञा माझ्या चिंतनी
तन-मन-धन-अस्तित्व लोपू दे मत्स्वरूपात अशेष....

विकल्प-संकल्पांना त्यागुन
निर्विकल्प शांतीत स्थिरव मन
माझ्या हाती निरव सुकाण
अनन्य श्रद्धेधरी दास मी, उरो न संशय लेश !

प्राण-मनाचा मी अद्भुत लय
अनाहताचा ध्वनी नादमय
मी तेजोमय ज्योती चिन्मय
धरुन शक्तिकर हाती माझा, कर शून्यांत प्रवेश !

सहस्रदळ-कमळी मी गंध
परम शक्तिचा अमृत स्पंद
मुक्त छंद मी परमानंद
प्रणवनाद मी अखंड माझा सत्रावीत निवेश !

(ॐ राजाधिराज योगिराज परब्रह्म सच्चिदानंद सद्गुरु श्रीपादवल्लभ श्रीसाईनाथ महाराज की जय !)

श्रीबाबांचा गुरुसंप्रदायच लोकविलक्षण होता. त्यांचे गुरुघराणे आगळेच होते. ज्ञान, कर्म, भक्ति आणि योग यांचे सारसर्वस्व त्यांच्या गुरूंनी निष्ठेच्या ओंजळीमधून त्यांना आकंठ पाजले. आपल्या संपूर्ण तपस्येची पुण्याई बाबांना दृष्टिवेधाचे स्तनपान घडवून त्यांच्या गुरूंनी अर्पण केली. शिष्याचे कर्म एका विटेत प्रेमरज्जूनी बंदिस्त करून ठेवले आणि देहप्रारब्धातून व कर्मफळातून त्याला मुक्तता दिली. हेंच दिव्य प्रेम आपल्या प्रेमानुसंधानातून श्रीबाबा भक्तांना देण्याचे श्रीकृष्णाप्रमाणेच प्रतिज्ञापूर्वक चिरंतन आश्वासन देतात.

श्रीबाबा जणू म्हणतात, "तुम्ही मंत्र, तंत्र, जप, तप, योग, याग, भक्ति, ज्ञान, कर्म यांपैकी कोणताही मार्ग आचरा अगर आचरू नका. सर्व साधनांच्या सिद्धीसाठी तुम्हाला मजकडेच यावे लागेल. कोणतेही साधन न आचरतांही केवळ श्रद्धेतून स्रवणाऱ्या माझ्या कृपेद्वारे तुम्ही कैवल्य-पदाचे अधिकारी व्हाल. भक्तिमार्ग तुम्हाला भावावस्थेत नेऊन सोडील, ज्ञानमार्ग सहजावस्था दर्शवील, कर्म नैष्कर्म्यापर्यंत पोहोचवील, योग कारण देहापर्यंत उंचावील. परंतु महाकारणात, तुरीयेत किंवा उन्मनीत नेण्यासाठी तुमचे प्रयत्न अपुरेच ठरतील, तेव्हा माझ्या कृपेचे स्वयंचलित उड्डाणच तुम्हाला तो दिव्य प्रदेश दाखवील. माझा शक्तिकर हाती धरून तुम्ही शून्यात, निर्विकल्पांत शिरू शकाल, कारण तो नाद, तो प्रकाश, तो आनंद माझ्या सच्चिदानंद स्वरूपाहून वेगळा नाही.

श्रीबाबांच्या दिव्य वाणीतून शब्दाकार झालेला तो अमृतमय उपदेश प्राशन करून जागृत झालेल्या माझ्या ऋतंभरा प्रतिभेने आपल्या दिव्य-चक्षूंनी त्या नादबिंदुकलांनी युक्त परंतु नादबिंदुकलातीत आनंदस्वरूपाचे दर्शन घेतले आणि त्या चिरंतन, आश्वासक आणि संजीवक संदेशाचा परिमळगंध शब्दांतून वाहून इथवर आणला! त्या पार्थसारथी कृष्णाचे श्यामसुंदर स्वरूप मनांत येतांच हृदय उचंबळून येते, अंगावर रोमांचांची फुले बहरतात. त्या दिव्य अमृतानुभवाचा 'श्रीसाईगीतायन' हा एक तेजःकण आहे.

श्रीबाबांच्या त्या दिव्य प्रेमानुसंधानाला कुणी 'दिव्य प्रेम' म्हणतील, तर कुणी "नित्यावधान" मानतील. त्या प्रेमप्रक्षेपणाची स्पंदनें आणि कंपने आपल्या श्रद्धामय हृदयांत ग्रहण करण्याचे सामर्थ्य श्रीबाबांनी आम्हाला द्यावे, हीच त्यांच्या मंगलचरणांशी विनम्र प्रार्थना! कारण याच प्रेमवेधांतून ती भक्तीची आर्तता, ज्ञानाची समदृष्टि, कर्माची समर्पण-भावना आणि योगाची प्राणमनोलयावस्था श्रीबाबा प्रकट करतील आणि जीवनाची परिपूर्णता, अस्तित्वाची विश्वात्मकता उमटू देतील. या दिव्यप्रदेशांत मानवी प्रयत्न, तर्क, शब्द आणि कल्पना यांची गति गुरुकृपेवाचून कुंठित आणि अगतिकच होते.

मानवी प्रतिभा, प्रज्ञा आणि प्रयत्न अपूर्णच आहे. शब्दांना मर्यादा आहे, सीमा आहे. श्रीबाबांचे जीवन असीम, अमर्याद व शब्दांना अगम्य आहे. त्यांचे चरित्र, लीला आणि माहात्म्य यांना ना आदि ना अंत! त्यांचे समग्र दर्शन घडवायला व्यास-वाल्मीकींचीही प्रतिभा अपुरी आहे.

## तूं आनंदाचा कंद —
## ३७. मी चकोर, प्रभु तूं चांद !

卐卐卐卐 卐卐卐卐卐卐卐卐卐

श्रीबाबांच्या उपदेशाची दिव्य गुरुगीता ऐकून श्रुति धन्य झाल्या. श्रीसाईहृदयच शब्दांच्या घाटांतून साकार झाले ! श्रद्धेच्या व शरणागतीच्या भावानें रोमांचित झालेले भक्तांचे देह व उचंबळलेली अंतःकरणें त्या जगद्‌गुरु साईच्या वैष्णवी दत्तपदांवर अधिकच लीन झालीं. सर्वांच्या जीवनाच्या सार्थकतेचा आणि प्रपंच-परमार्थांच्या कृतार्थतेचा तो परमोच्च बिंदू होता. ग्रंथाचा प्रपंच न मांडणाऱ्या, मंत्रोपदेशाचा, साधनांचा बडिवार न माजवतां जीवनाला अद्‌भुत प्रेमदृष्टिवेधाचा दिव्य स्पर्श अगदी सहज आणि सरळतेनें करणाऱ्या त्या चैतन्यशक्तीचा तो शब्दसाक्षात्कार होता ! आणि तो शब्दबद्ध असूनही शब्दातीत अनुभव होता ! तो दिव्य संदेश माझ्या प्रतिभेतून घुमू लागला. त्या दिव्य दर्शनाने जागृत झालेली ऋतंभरा वाणी म्हणूं लागली :-

तूं आनंदाचा कंद मी चकोर, प्रभु तूं चांद !
तूं परमज्योतिचा स्पंद मी नयनावाचून अंध....
तूं अनाहताचा नाद मी पार्थिवतेचा साद
तूं अद्‌भुत प्रेमानंद मी लहर तुझी उद्‌बध....
तूं स्वाती-मेघ-निनाद मज कृपाबिंदुचा वेध
तूं अमृतस्पर्श-प्रसाद करि विषादही आल्हाद !
तूं समतेतिल संवाद अस्मिताच मी निर्बंध
तूं दिव्य तराणा धुंद वैखरीच मी सानंद...
खेळसी प्राणदेहात चित्तात अहंकारात
दिव्याचा उठवित साद समरससी ब्रह्मानंद...
नाचती स्वरातुन छंद भक्तीत तुझ्या बेबंद
तुज आळवितो स्वच्छंद शब्दांत भरुन आनंद !
प्रीतीचा फुटला बांध दरवळला परिमळ गंध
तुटलेच भवाचे बंध मी उरलो परमानंद !

## ३८. चंद्रास मिळाली ज्योती !

श्रीसाईबाबांनी आपल्या मानवी देहाचे कार्य चैतन्यदेहाच्या कार्यासाठी आता आवरते घ्यावयाचे ठरविले. मातृहृदयाने श्रीबाबांना सांभाळणाऱ्या पुण्यचरित बायजाबाईंचा सुपुत्र मृत्युशय्येवर होता. एके दिवशी अचानक गुरूंनी बंदिस्त केलेल्या कर्माची वीट द्वारकामाईमध्ये भंग पावली. प्रभूंनी भक्ताचा अंत स्वतःवर ओढवून घेतला. शिरडीचा चैतन्यसूर्य देहाच्या सीमांतून बाहेर पडला आणि विश्वात्मकतेच्या चैतन्य शिखरावर पूर्णतेजाने तळपू लागला. दक्षिणायनात धूम्रमार्गाने प्रभूची ज्योत चंद्रज्योतीस मिळाली आणि पृथ्वीभोवती प्रेमाचे गुंजन करीत भ्रमू लागली.

शिरडीच्या त्या दिव्य चैतन्यज्योतीनें १९१८ च्या विजयादशमीस मानवी देहाच्या सीमा ओलांडल्या व ते असीम आणि विश्वव्यापी बनले. पुण्यचरित बायजाबाईंच्या सुपुत्रास नवजीवन द्यावयास प्रभूंनी देहान्त ओढवून घेतला. कबीरानें विश्वाच्या सेवेसाठी पुन्हा अवतरतां यावे म्हणून काशीक्षेत्राऐवजी मगहर या निषिद्ध गावी १५१८ मध्ये देह ठेवला. चारशे वर्षांनी श्रीबाबांनीही दक्षिणायनांत धूम्रमार्गाने प्राणप्रयाण घडविले. दिक्कालाच्या प्रारंभापासून भक्तांच्या प्रेमासाठी नवनव्या रूपाने संचारणारी ही वैष्णवी प्रेमशक्ति, हा प्रेमाचा चिरयात्रिक, गुरुकृपेचा आणि साक्षात्कार-संगीताचा शाहीर, धर्मपंथहीन मानवतेचा कैवारी चैतन्यरूपाने वावरू लागला. देहविसर्जनानंतर श्रीबाबांच्या कृपेचा प्रभाव शतगुणित झाल्याचा भक्तांना प्रत्यय येऊ लागला. सूक्ष्मस्थूलातील त्यांचा संचार अनिरुद्धपणे, अखंडपणे चालू राहिला. युगायुगांचा अंधकार उजळीत हा अखंड प्रेमावतार मानवजातीसाठी दीपस्तंभासारखा तेवत आहे, अविरत प्रज्वळत आहे.

चंद्रास मिळाली ज्योती
दीप्तीस मिळाली दीप्ती
प्रभु कुडीस अपुल्या त्यजती
शांतीस मिळाली शांती ॥ ध्रु० ॥

* * *

ती विजयादशमी होती
जन सीमोल्लंघन करिती
लुटण्यास बेगडी सोने
स्नेहाने जवळी येती
देहाचे सोने झाले
प्रभू सीमा ओलांडीती !

नात्यांच्या जीवनग्रंथी
सानंद झेलिला मृत्यु
वाराया जीवित त्यांचे
ती अखेर-घटिका होती
बाबांनी भक्तासाठी
प्रभु मरण स्वतःवर घेती !

बंधने औट देहाची
मातीचे तुटले बंध
जी बद्ध न मृण्मयतेत
खळखळली गळली खाली
लाटेला लाट मिळाली
ती विमुक्त झाली शक्ती !

* * *

वन्सीधर साई मुकुंद
चैतन्य कुडीतुन मुक्त
मृत्युंजय मारुन मरणा
मुरलीधर मंदिरी आले
जणु विश्व राउळी खेळे
प्रभु अक्षय आसनी वसती

रवि झुकला होता किंचित
भक्तास्तव जीवितयात्रा
जीवलोक जपण्यासाठी
दक्षिणेत अयनांशात
संपविली धूम्रपथात
रविमंडळ रमती भ्रमती

त्या अपार चैतन्याला
अडवतील मग का पाश
मातीस मिळाली माती
नच बंधन दिक्कालाचे
त्या मातीच्या देहाचे
ज्योतीस मिळाली ज्योती

परि देहाला निरपेक्ष
पायात गुंतले धागे
भक्ताच्या हाकेसाठी
बांधिती बंध प्रीतीचे
भक्तिच्या आर्त भावाचे
प्रभु समाधितुनी उठती

त्या दिव्य फकीर-प्रभूचा
त्या अद्भुत सामर्थ्यास
कर्माची फुटता वीट
तो दिव्य कर्मसंन्यास
प्रेमाचा एकच ध्यास
प्रभु विश्वरूपता घेती

ऐकता प्रेममय बोल
स्पंदुनी प्राण मातीत
प्रभु साक्षात विश्वाकार
ती तुर्वत अजुनी डोले
ती दिव्य चेतना बोले
मूर्तिमंत जागृत पुढती

येताच भक्तिची साद
ती माती दे पडसाद
त्या हाडामधुनी स्फुरती
प्रेमाचे हितगुज शब्द
भक्तांचा चिंताभार
प्रभु माथ्यावर मिरविती

* * *

जे मायारूप अनित्य
ठरलेला त्याचा अंत
जे जागृत अक्षय सत्य
ते मृत्युंजय जगी नित्य
इतिहास जाहला भाट
गातसे प्रभूची कीर्ती

## ३९. प्रभूंचा अखंड हा अवतार !

केवळ प्रेममय अनुसंधानातून गुरुकृपेचा वर्षाव करणारा हा श्रीसाई प्रभूंचा अवतार जन्ममरणातीत आहे. त्या अवताराच्या कृपाकरुणेला अंत नाही ! त्या प्रेमशक्तीला सीमाच नाही ! पूर्वावतारात या वैष्णवी प्रेमशक्तीने निराळा आविष्कार प्रगट केला होता. कृष्णमय पूर्णब्रह्म शुकमुनींचे तपःसामर्थ्य, आदिनाथांचे गुरुकृपा सामर्थ्य, धर्मजाति-पंथहीन समतेचे व साक्षात्काराचे उद्गाते कबीरदास यांचे प्रतिभासामर्थ्य याही अवतारात परिपूर्ण होते. परंतु या प्रेमशक्तीने ते दाहक तेज आत्मसात् करून भक्तांना–भक्तचकोरांना या प्रेमचंद्राने केवळ नितांत सुंदर कृपा-कौमुदी तेवढी दिली.

हा अखंड अवतार कधीही न संपणारा आहे. अनादि, अजन्मा आणि अनंत, प्रेम-करुणेचा एकमेव आविष्कार आहे. समर्पणातून भवबंधन विलयाला नेणारा ज्ञानाग्नि ! प्रारब्धव्यथांचा डांब शमवून जीवन रसपूर्ण करणारी अमृतसंजीवनी, व्यथेतून आनंदाचा छंद फुलविणारी कल्पवल्ली, समाधीमधून प्रेमाचा पुकार करणारी दिव्य योगशक्ति. चिरंतनाचा सारथी, परमार्थपंथावरील गुरु आणि संसारातला स्नेहपूर्ण सखासोबती ! प्रारब्धाचे अटळ भोग कर्तव्याला विन्मुख न होता भोगणाऱ्या भक्ताला प्रेमरसांत मुरवीत जन्ममृत्यूच्या पार नेणारी दिव्य व प्रगट ज्योती...

प्रभूंचा अखंड हा अवतार !
उजळित राही निजतेजाने अविरत अंधकार

हा न जन्मतो विलया जातो,
दिक्कालांना अतीत उरतो,
युगायुगातुन हा संचरतो
प्रेमरसाचा याच्या अठरा भुवनांना आधार !

भक्तीचा हा सदा भुकेला
धुंडित चाले भक्त पात्रला
प्रेमास्तव हा विकला मुकला
युगायुगातुन वरसत येतो एकच करुणाधार !

एक प्रेममय अखंड साधन
भगवंताचे गुणसंकीर्तन
तनमनधन-अस्तित्व-विसर्जन
समर्पणातुन भवबंधन ने विलया मायाकार !

आर्त पिपासित नित्य उपेक्षित
यास्तव अंतर करुणरसांकित
कालदिशांचा भेदुनिया पट
मेघदयेचा ओथंबुनि हा वर्षितसे जळभार !

दुःख-व्यथांचा डोंब उसळला
रडे ओरडे जीव पोळला
प्रारब्धाचा डाव रंगला
अमृतस्पर्शे शमवित राही करि रसमय संसार !

तापत्रयातुन जरा वारितो
ममतेमधुनी समता देतो
स्पर्श दिव्य जीवितास करितो
व्यथेतुनी हा छंद फुलवितो नित आनंदाकार !

अन्त नसे याच्या करुणेला
मृण्मय देही हा न बांधला

शरीरसीमामधि न संचला
मातीतुनही स्पंदत उठतो घालित प्रेमपुकार !

भक्तभार वाहतो शिरावर
समाधीतुनी दे ललकार
उभा प्रेममय हा हांकेवर
चिरंतनाचा सखा सारथी सन्मुख स्नेहाकार !

सुखे अटळ प्रारब्ध भोगतां
कर्तव्याला विमुख न होतां
अनासक्ति दे मुक्ती हातां
भगवत्प्रेमी मुरवित नेई जन्ममृत्युच्या पार !

## ४०. शिरडी वैकुंठपुरी, साइप्रभू श्याम !

धर्मस्थापना, सज्जनांचा उद्धार, दुष्टनिर्दाळण यांसाठीं युगायुगांत प्रकट होणाऱ्या श्रीपाद श्रीवल्लभ नारायणाची ही प्रेमशक्ती शिरडीत अखंड नांदते आहे, म्हणूनच ही शिरडीची द्वारावती ही एक वैकुंठपुरी आहे. या श्यामहरीची ती द्वारकाच आहे. प्रारब्धाचे अटळ भोग कर्तव्याला विन्मुख न होता साहणाऱ्या श्रद्धावंताचे भोग हा साई स्वतःवर घेतो, सौम्य करतो. जीवनातील कठोर समरप्रसंगात त्याला धैर्य देतो, वेदनेला दिलासा देतो, भक्ताला भगवत्प्रेमात बुडवून जन्ममृत्यूच्या पैलपार नेतो. त्या प्रभूच्या या दिव्य क्षेत्राची आज आपण यात्रा करू या. ही यात्रा नव्हे. हा मोक्षाचा दिव्य पंथ आहे, अज्ञाताची सीमा आहे, मुक्तीचा दीपक आहे. शिरडीची धूळ प्रभुस्पर्शाने पावन झाली आहे. येथला कणकण बाबांच्या चरित्रलीलांच्या गंधाने परिमळला आहे. या भक्ति-पंढरीच्या सीमेवर या शिवस्वरूप खंडोबाचे दर्शन घ्या. त्या भक्तपूर्ण कामप्रभूचे चरण येथेच प्रथम उमटले ! धूपाच्या दरवळात गुरुपादुकांचे कल्याणकारी दर्शन घ्या. ते पहा समाधिमंदिर, त्याचा सुवर्णांकित कळस, ते पहा तपोवन, ती द्वारकामाई ! येथेच तो नटनागर गिरिधर श्यामसुंदर आपल्या गोपाळगड्यांसह खेळला, बागडला...

शिरडी वैकुंठपुरी, साइप्रभू श्याम ॥ ध्रु० ॥
ही यात्रा दिव्याची, हेच चार धाम

ही काशी, रामेश्वर
भक्तिपेठ पंढरपुर
या असार संसारी, हाच श्रमविराम

खंडोबा सन्मुखसे
अजुन फकिररूप दिसे
अवतरले येथ प्रथम भक्त-पूर्ण-काम

अजुन तपाच्या स्पर्शे
निंब मधुरता वर्षे
परिमळते धूपासह श्रीगुरुंचें नाम !

भव्य कळस हेमवर्ण
झळकतसे वरि निशाण
नयनि दिसे मंदिर हे सकलसौख्यधाम !

येथ समाधीमधुनी
नित्य उठे करुणाध्वनि
तुडवित ये जडसीमा चेतना असीम !

द्वारकेत नटनागर
चक्रपाणि श्रीगिरिधर
येथ प्रभू-चरणावर लाख हे प्रणाम !

हें मंगल क्षेत्र परम
हे अखंड प्रेमधाम
गोदावरि-तीरातुन झरे दिव्य प्रेम !

ही यात्रा दिव्याची
ही सीमा ज्ञाताची
मोक्षाचा पंथराज, हे शरण्य-धाम !

# ३१. प्रभो, घ्या चरणीं लाख प्रणाम !

त्या मनमोहन श्यामसुंदर श्रीहरीच्या भक्तिपंढरीची म्हणजे शिरडीची मंगल यात्रा घडली. दिशांच्या आणि काळाच्या भिंती तोडून श्रीबाबांनी आपल्या दिव्यचरित्राचे, अद्‌भुतरम्य लीलांचे आणि चिरनूतन, अनुभवसंपन्न आणि अमृतमय तत्त्वज्ञानाचे दर्शन अत्यंत प्रेमाने माझ्या प्रतिभाचक्षूंना घडविले. त्या दिव्यतेचे अमर रसायन प्राशन करून प्रेमोन्मत्त झालेल्या माझ्या प्रज्ञाप्रतिभेने ती सुरतरंगिणी स्वर्गंगा महाराष्ट्र-भाषेच्या शब्दनगरीतून प्रवाहित केली. तो अमृतरस कधीही संपणारा नाही. युगायुगांतून शतकाशतकाच्या किनाऱ्यांतून त्या प्रेमशक्तीचे गुणगायन अखंड गायिले तरी त्या माधुर्याने पूर्ण तृप्ती झाली असे वाटणार नाही, अशी अवीट गोडी त्या चरित्रगंगेच्या मंगलमय तीर्थजलाला आहे.

या शब्दसाधनेत, या गीतगुंजनात आणि या गुणानुवादात मी इतका रंगलो आहे कीं, माझ्या मन, प्राण, देह, चित्त आणि अहंकाराचे त्या चरित्रचंद्रिकेत संपूर्ण विसर्जन झाले आहे. त्या चरणावाचून आता दृष्टीला काहीच दिसत नाही, श्रुतींना काही ऐकूं येत नाही. स्वानंदाची निर्झरी उंचबळत आहे. कृपेचा दरवाजा मुक्त झाला आहे. भक्तीतील आर्तता, ज्ञानातील सहजावस्था आणि चिदानंदाचा योगमय अमृतकल्लोळ आता आकळला आहे ! पंख मुक्त झाले आहेत. या चकोराला आता अवकाशाची व्याप्ती अपुरी आहे. चकोर आज चंद्र बनला आहे आणि साईचंद्रही आज चकोर बनला आहे–या समरसतेच्या चंद्रिकेत आता सर्वस्व न्हाऊन निवाले आहे ! या प्रेमभक्तीच्या अद्वैताला आता गीतांतून अमृताचे छंद फुटले आहेत. वेदनेलाही सौख्याची किनार लाभली आहे. आनंदच सौख्याला सलतो आहे. हीच निर्वेदाची आनंद देवता श्रीबाबा ! कृपामया, करुणाकरा, प्रेमस्वरूपा ! आता तुमचा आणि माझा हा एकपणा साऱ्या संसाराला ललामभूत झाला आहे. ही एकता या भैरवीच्या आर्तस्वरातून व्यक्त होऊ दे.

प्रभो, घ्या चरणीं लाख प्रणाम !
शरणागत मी केवळ अपुला बंदा एक अनाम....

त्रिभुवन-तारक चरण आपुले
तिथेच माझे प्राण गुंतले
त्या प्राणांतुन झंकारित ये मंगल अपुले नाम !

संग्रह शाखा

तुम्ही सेवेतुन शरणागतितुन
ज्ञानपिपासित प्रणिपातातुन
महाद्वार उघडिलें कृपेचें दाखविलें सुखधाम....

उचंबळे स्वानंद-निर्झरी
प्रेम खळाळे भरुन अंतरी
पंख मोकळे करुनि दाविले विश्व नवे अभिराम !

भक्तीतिल उलगडे आर्तता
ज्ञानातिल उमगली दिव्यता
चिदानंद लहरीत उसळतो स्पंदत आत्माराम....

तनमनधन जाहले समर्पण
तुम्हात विरले माझे मीपण
अक्षय अपुला एकपणा हो संसारास ललाम !

लवहि दुजेपण नुरले आता
आनंदाचे धन ये हाता
अपुला परिमळ उधळतात या गीतांचे सुमदाम....

तुपार झाला विशाल सागर
मेघ सांवळा वने मयूर
अष्टभाव रोमांचुन गाती अद्वैताचा साम....

चकोर झाला शशिकर सुंदर
चंद्रहि बनला आज चकोर
समरसतेच्या पौर्णिमेत या सकलमुक्तिचे धाम !

**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।**

REFBK-0018588

REFBK-0018588